- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, १० ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३०१ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- ✔ २४ कॅरेट : १,५३,७०० /-
- ✔ २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- ✔ चांदी : २,४३,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# फडणवीस निवडणूक आयोगाचे वकील

## शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी लगावला टोला

**वृत्तसंस्था, पुणे**

एसआयआर प्रकरणी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात रोष वाढत आहेत. त्यांच्यावर चौफर टीका होत असून त्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी होत आहे. पण निवडणूक आयोगावर आरोप होत असताना भाजपचे नेते उत्तर देत आहेत. या पार्श्वभुमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवडणूक आयोगाचा वकील म्हणून नेमले आहे असा टोला शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे. तसेच राज्यात ताबडतोब निवडणुका लावल्या तर मिंधे गट आणि भाजप इथे औषधलाही राहणार नाही असेही संजय राऊत म्हणाले.

जुन्नरमध्ये पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, मूळ शिवसेना ही उद्धव ठाकरे यांची आहे. बाकी सेना डुप्लिकेट आहेत, या डुप्लिकेटचा खेळ सर्वोच्च न्यायालय संपवणार. ज्या पद्धतीने सुनावणी पुढे चालली आहे आणि निवडणूक आयोगाने आणि तेव्हाच्या सर्वोच्च न्यायालयाने शिवसेनेचे तुकडे करताना असंविधानात्मक पद्धतीने जी पापं केली, त्याच पापाविरोधात आज आगडोंब उसळलेला आहे. त्यामुळे आता मूळ शिवसेनेचेच राज्य येईल. २०२४ साली सुद्धा विधानसभेत शिवसेनाच जिंकली होती हे आता लोकांना पटायला लागले आहे. राज्यात आणि देशात भाजपचा विजय कसा झाला हे आता ज्ञानेश कुमारांचे कारनामे समोर आले आहेत. राज्यात मिंधे, फडणवीस आणि ज्ञानेश कुमार या त्रिकुटाचे जे कारनामे झाले त्यातून हा अकृत्रिम पराभव घडवला गेला.

ज्ञानेश कुमार यांचा निकाल लावा आणि ताबडतोब निवडणुका लावल्या तर मिंधे गट आणि भाजप इथे औषधलाही राहणार नाही. आम्ही आशावादी आहोत, जनतेचे अनेक प्रश्न आहेत त्यावर देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार बोलत नाहीत. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकदिवसा आड दिल्लीत असतात. त्यांच एवढं दिल्लीत काय काम असते आम्हाला माहित नाही. या सगळ्या गोष्टींची नोंद जनता करत असते. राज्यात दुष्काळ पडला आहे आणि त्यावर कोणीही गांभीयार्ने चर्चा करताना दिसत नाही. महाराष्ट्रात जमिनीवर काम करणारा एकच पक्ष आहे तो म्हणजे शिवसेना, असे संजय राऊत म्हणाले.

इंडिया आघाडीचे महत्त्वाचे घटक आहोत. सहा तारखेला संसदेकडे जो मोर्चा गेला, त्यात राहुल गांधींसोबत सर्वात पुढे मीच होतो. त्यानंतर उशिरा मुंबईत आलो. १० तारखेनंतर आम्ही मोकळे आहोत. दिल्लीत कितीही मोठे आंदोलन होऊ दे, तुरुंगात जावं लागलं तरी चालेल आम्ही तयार आहोत.



आमचे खासदार अरविंद सावंत अमरावतीत शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत अडकलो आहोत. मी जुन्नरला आलो आहे. दिल्लीतले कार्यक्रम ठरलेले नव्हते आणि आमचे कार्यक्रम ठरले होते ते पूर्ण करू आणि मग आम्ही दिल्लीत जाऊ, असेही संजय राऊत म्हणाले.

### मतदानापासून वंचित ठेवणे चुकीचे

एसआयआरचे समर्थन म्हणजे घोटाळ्याला समर्थन नव्हे. ज्या मतदारांचा मृत्यू झाला आहे, त्यांची नावं हटवण्यात गैर नाही. पण एखाद्या भागात शिवसेनेला मतदान होत आहे, म्हणून ती नावं काढायची, बंगालमध्ये एक विशिष्ट समुदाय तृणमूलला मतदान करतो म्हणून त्यांना मतदानापासून वंचित ठेवायचं याला एसआयआर नाही म्हणत. ज्ञानेश कुमार एक नंबरचा भ्रष्ट आणि घोटाळेबाज माणूस आहे.

भाजपला त्यांचा एवढा पुळका का आलाय? निवडणूक आयोगावर जर काही आरोप होत असेल तर निवडणूक आयोग उत्तर देईल. देवेंद्र फडणवीस यांना निवडणूक आयोगाचा वकील म्हणून नेमले आहे का? निवडणूक आयोग जर एक संविधानिक संस्था असेल तर त्यांना त्यांची बाजू मांडू द्या. ज्ञानेश कुमार भुमीगत झाले आहेत कुठे पळून गेले आहेत? एसआयआरमध्ये घोटाळा झाला हे आम्ही सांगतच होतो. पण दोन निवडणूक आयुक्तांनी आपली असहमती व्यक्त केली आणि त्यानंतर या प्रकरणाने अधिक पेट घेतला, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कळाले पाहिजे, असेही संजय राऊत यावेळी म्हणाले.

## देशात अप्रत्यक्ष आणीबाणी



**मुंबई :** देशभरात सध्या आंदोलनाचीच चर्चा असून महाराष्ट्रातील पुणे शहरात एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने वातावरण तापले असताना, दुसरीकडे राजधानी दिल्लीत काँग्रेसही आक्रमक झाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन सुरू केले आहे. त्याच पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दिल्ली सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले असून काही मार्गांवर रेल्वे, मेट्रो बंद करण्यात आले असून पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात आहे. आता, त्यावरुन शिवसेना उबाठा पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरेंनी सरकारवर हल्लाबोल केला आहे.
देशात आता अप्रत्यक्ष आणीबाणी सुरू आहे, भाजप यावर बोलत नाही. मुंबई आणि महाराष्ट्राची यांना भीती आहे, लोकांना ताब्यात घेत आहेत, नोटिसा पाठवत आहे. या देशात आणीबाणी लागू केली आहे, याबाबत बोलायची हिंमत नाही, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी केंद्रातील मोदी सरकारवर हल्लाबोल केला. दिल्लीतील आंदोलनास आम्हीही पाठिंबा दिलेला आहे, आमचे नेते संजय राऊत दिल्लीत आहेत, गद्दार ज्ञानेश कुमार गेलेच पाहिजेत. पुण्यात हजारो आंदोलक बसले आहेत, त्यांचा घरीही दुष्काळाची झळ आहे. मात्र, पेपर फोडणाऱ्याला हे काढत नाहीत. मुख्यमंत्री आपल्या मित्राला का वाचवत आहेत? असा सवाल करत आदित्य ठाकरेंनी विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्यावर भाष्य केले.

## थोडक्यात

### सोन्याची चमक जागतिक बाजारात खालावली

**नवी दिल्ली :** सोन्याची किंमत झपाट्याने वाढत असताना आता त्या वेगाने घसरण पाहायला मिळत आहे. जागतिक बाजारपेठेत सोन्याच्या किंमती २७ टक्क्यांनी घसरल्या आहेत. भारतीय बाजारपेठेत जानेवारीपासून आतापर्यंत २३ टक्क्यांनी दर कपात झाली आहे. त्यामुळे सण, उत्सवाच्या वातावरणात सोने खरेदी करणाऱ्यांना अद्याप हा प्रश्न पडला आहे की सोन्याचे दर आणखी घसरणार आहेत का? एमसीएक्सवर सोन्याचे दर ऑगस्ट अखेरीस प्रति १० ग्रॅम १ लाख ६४ हजार ७७३ रूपयांवर पोहचले होते. त्यानंतर सोन्याच्या किंमतीत घट पाहायला मिळत आहे.
मागील आठवड्यात प्रति ग्रॅम भाव १ लाख ४५ हजार ९९१ पर्यंत घसरला होता. जागतिक बाजारपेठेत सोन्याचे दर घसरत आहेत. सोन्याच्या किंमती घसरण्यामागे कारणे सोन्याच्या किमतीतील अलीकडील घसरणीमागे अनेक जागतिक घटक आहेत. सुरुवातीला विक्रमी उच्चांक गाठल्यानंतर गुंतवणूकदारांनी केलेल्या नफावसुलीमुळे किमतींवर दबाव आला. त्यानंतर अमेरिकेतील महागाई आणि व्याजदरांविषयीच्या वाढत्या चिंतेनेही सोन्याच्या वाढीला कमकुवत केलेअमेरिकेच्या वास्तविक बॉण्ड उत्पन्नातील तीव्र वाढीमुळे व्याजरहित सोने गुंतवणूकदारांसाठी कमी आकर्षक बनले आहे.
डॉलरच्या मजबुतीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्यावर दबाव वाढला आहे. याशिवाय वाढत्या महागाईची भीती आणि अमेरिकेच्या व्याजदर धोरणातील कठोरपणाचाही सोन्याच्या किमतींवर परिणाम झाला आहे.

# बस-ट्रकच्या धडकेत ३२ बीएसएफ जवान जखमी




**वृत्तसंस्था, बारपेटा**

आसाममधील बारपेटा जिल्ह्यातील हाउली येथे राष्ट्रीय महामार्ग २७ वर बीएसएफ जवानांना घेऊन जाणाऱ्या बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात बीएसएफचे ३२ जवान जखमी झाले असून, बस चालकाचा जागीच मृत्यू झाला. जखमींपैकी १४ जवानांची प्रकृती गंभीर असून एकाची प्रकृती चिंताजनक आहे. गंभीर जखमींना बारपेटा मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.
निवडणूक ड्युटीवरून परतत असताना जवानांची बस ट्रकच्या मागील भागावर धडकली. ही बस धुब्रीच्या दिशेने जात असताना ही धडक झाली. जखमींपैकी एकाची प्रकृती चिंताजनक असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. बसचालकाचा जागीच मृत्यू झाला. समसुल हक (४२) असे मयत चालकाचे नाव आहे. अपघाताची माहिती मिळताच हाउली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. पोलिस पुढील तपास करत आहेत.

### स्फोटके निकामी करताना ४ जवान जखमी

**सुकमा :** छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त सुकमा जिल्ह्यात निकामी व जुनी स्फोटके नष्ट करत असताना झालेल्या अपघाती स्फोटात केंद्रीय राखीव पोलिस दलाचे (सीआरपीएफ) चार जवान जखमी झाले आहेत. यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. भेजी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एलारमडगु सुरक्षा शिबिराजवळ गुरुवारी सायंकाळी ही दुर्घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, कोंटा रेंज अंतर्गत येणा-या भागातील विविध शिबिरांची पाहणी करणे आणि तेथील निरुपयोगी तसेच शिल्लक राहिलेली स्फोटके सुरक्षितपणे निकामी करण्यासाठी सीआरपीएफच्या ५०व्या बटालियनचे दारूगोळा तांत्रिक पथक जगदलपूरहून एलारमडगु शिबिरात पोहोचले होते. हे पथक सुरक्षा शिबिरापासून सुमारे २०० मीटर अंतरावर असलेल्या बोडराजपदार नाल्याजवळ सर्व सुरक्षा नियमांचे पालन करत स्फोटके निकामी करण्याचे काम करत होते.

# एमपीएससी आंदोलनप्रकरणी १५ जणांवर गुन्हा दाखल

**वृत्तसंस्था, पुणे**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) प्रलंबित मागण्यांसाठी पुण्यातील एस. एम. जोशी पुलाजवळ सुरू असलेल्या आंदोलनावर आता पोलिसांनी कायदेशीर बडगा उगारला आहे. परवानगी रद्द झाल्यानंतरही बेकायदेशीर जमाव जमवून रस्ता अडवल्याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी १५ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.
पोलिसांनी प्रमोद पाटील, अक्षय कांबळे, अनिकेत देशमाने, प्रवीण महादेव पाटील, ऋषिकेश गांगुर्डे, प्रियांका चौधरी, नितीन गिते, सोमनाथ चव्हाण, ओंकार पाटील, गजानन शेळके, अजित काकडे, सिद्धार्थ पंचांगे, संकेत कणसे, सिद्धार्थ जांभुळकर आणि साहेबराव क्षीरसागर या १५ जणांवर व त्यांच्या इतर सहकाऱ्यांवर गुन्हा नोंदवला आहे. परवानगी नसताना आंदोलन करणे, चिथावणीखोर वक्तव्ये करणे आणि वाहतुकीला अडथळा आणणे असे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत.



परवानगी रद्द झालेली असतानाही आंदोलकांनी कोणतीही पूर्वकल्पना न देता किंवा नव्याने परवानगी न घेता पुन्हा आंदोलन सुरू केले. सलग आठ दिवस रस्ता अडवून धरल्याने वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार वाहतुकीचा मुक्त प्रवाह कायम ठेवणे ही राज्याची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस उपायुक्त प्रशांत अमृतकर यांनी आंदोलकांना नोटीस बजावून आंदोलन मागे घेण्यास किंवा सुचविलेल्या पयार्यी जागेवर जाण्यास सांगितले होते.
मात्र, पोलिसांच्या या नोटिशीकडे दुर्लक्ष करून रस्ता अडवून आंदोलन सुरूच ठेवल्याने अखेर विविध कलमांन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर परवानगी झाली होती रद्द

विद्यार्थी प्रतिनिधींना एस. एम. जोशी पुलाजवळ २ ऑक्टोबर रोजी सशर्त आंदोलन करण्यासाठी २६ सप्टेंबरला परवानगी देण्यात आली होती. मात्र, ३० सप्टेंबर रोजी विद्यार्थी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन मुख्यमंत्र्यांनी बहुतांश मागण्या मान्य केल्या. त्यानंतर प्रतिनिधींनी २ ऑक्टोबरचे आंदोलन स्थगित करत असल्याचे लेखी पत्र पोलिस आयुक्तांना दिले होते, ज्यामुळे आंदोलनाची पूर्वीची परवानगी आपोआप रद्द झाली होती.

# दुष्काळाच्या छायेत पीक वाचविण्याची धडपड ठरली जीवघेणी, करंट लागून शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

तालुक्यातील शिवणी भोंडकी येथील घटना; कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनाने परिसरात हळहळ होत आहे. रामटेक तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी हवालदिल झाला असतानाच, हातातोंडाशी आलेले पीक वाचविण्यासाठी धडपड करणाऱ्या एका शेतकऱ्याचा विजेच्या धक्क्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. शिवणी भोंडकी येथील मुरलीधर रामाजी आंबीलढुके (वय ४५ वर्षे) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, शेतकरी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### दुष्काळाच्या संकटात पीक वाचविण्यासाठी धडपड

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचा फटका शेतीला बसत असून, पावसाअभावी पिके वाळण्याच्या मार्गावर आहेत. मोठ्या कष्टाने आणि खर्च करून उभे केलेले पीक डोळ्यांसमोर करपताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. अशा परिस्थितीत हातातोंडाशी आलेले पीक वाचविण्यासाठी शेतकरी शेततळे, नाले आणि उपलब्ध असलेल्या पाण्याच्या इतर स्रोतांच्या मदतीने पिकांना पाणी देण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत.
पीक वाचविण्यासाठी दिवस-रात्र शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांसमोर



आता नैसर्गिक संकटासोबतच जीवितालाही धोका निर्माण होत आहे. याच पार्श्वभूमीवर मुरलीधर आंबीलढुके यांच्या मृत्यूच्या घटनेने शेतीसमोरील संकटाची भीषणता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

### कुटुंबाचा आधार हरपला!

मुरलीधर आंबीलढुके यांच्या मृत्यूने त्यांच्या कुटुंबातील कर्ता व्यक्ती हरपला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. कुटुंबाच्या उदरनिवार्हाचा आधार असलेल्या व्यक्तीचे अचानक निधन झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेनंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी रामटेक येथील उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आला. या घटनेमुळे शिवणी भोंडकी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याची मागणी

दुष्काळी परिस्थितीत पीक वाचविण्यासाठी धडपड करणाऱ्या शेतकऱ्याचा अशा प्रकारे मृत्यू झाल्याने शासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे. मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने नियमानुसार आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, तसेच संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबाला आधार द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.
या घटनेचा पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहेत. दुष्काळामुळे पिके वाचविण्यासाठी सुरू असलेली शेतकऱ्यांची धडपड आणि त्यातून घडलेली ही दुर्दैवी घटना संपूर्ण परिसराला सुन्न करणारी ठरली आहे.
दुष्काळाने पिके करपण्याची वेळ आणली आणि पीक वाचविण्याच्या धडपडीत शेतकऱ्याचा जीव गेला. आता या दुःखद प्रसंगात शासन मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाच्या मदतीला धावून येणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## ज्येष्ठ नाटककार, लेखिका आणि दिग्दर्शिका सई परांजपे यांना यंदाचा विष्णुदास भावे गौरव पदक पुरस्कार जाहीर



**वृत्तसंस्था, पुणे**

ज्येष्ठ नाटककार, लेखिका आणि दिग्दर्शिका सई परांजपे यांना यंदाचा विष्णुदास भावे गौरव पदक पुरस्कार जाहीर झाला आहे. नाट्य क्षेत्रातील मानाच्या पुरस्काराचे वितरण पाच नोव्हेंबर रोजी रंगभूमी दिनी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष मोहन जोशी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. गौरव पदक, ३० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे अशी माहिती अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत सांगितले.
सई परांजपे यांनी बालनाट्य, प्रौढ नाटके, नाट्यलेखन, दिग्दर्शन आणि अनुवाद अशा विविध क्षेत्रांत योगदान दिले आहे. वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा ह्यमुलांचा मेवाह्ण हा पहिला ग्रंथ प्रकाशित झाला. आई शकुंतला परांजपे आणि आजोबा रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांच्या प्रोत्साहनातून त्यांच्या कलात्मक प्रवासाला दिशा मिळाली. जास्वंदी या नाटकाला १९७८ मध्ये महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट नाट्यनिर्मितीचा पुरस्कार मिळाला.

संपादकीय लेखणीतून...

# ऐसा नाना पुन्हा होणे नाही!

आपल्या दमदार अभिनयाने आणि खास संवादफेकीने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे गुरूवारी पहाटे (८ ऑक्टोबर) वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. त्यांना छातीत दुखत असल्याची माहिती मिळाल्यानंतर वैद्यकीय पथक गोव्यातील डोना पावला येथील त्यांच्या फ्लॅटवर पोहोचले; मात्र त्यावेळी नाना पाटेकर प्रतिसाद देत नव्हते. त्यांना सीपीआर देण्यात आला आणि तातडीने मणिपाल रुग्णालयात नेण्यात आले; मात्र, रुग्णालयातील वैद्यकीय पथकाने सकाळी ५.२० वाजता त्यांना मृत घोषित केले. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने (कार्डियाक अरेस्ट) त्यांचे निधन झाल्याचे वृत्त आहे. त्यांचे शवविच्छेदन करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. शेखर साळकर यांनी दिली. नाना पाटेकर यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत अभिनयाची एक वेगळी शैली निर्माण केली. गंभीर आणि संवेदनशील भूमिकांपासून विनोदी आणि खलनायकी भूमिकांपर्यंत त्यांनी विविध व्यक्तिरेखा साकारल्या. प्रभावी संवादफेक, सहज अभिनय आणि वैशिष्ट्यपूर्ण शैलीमुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. १९७८ मध्ये गमन या चित्रपटातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर परिंदा, प्रहार, क्रांतिवीर, अग्निसाक्षी, खामोशी : द म्युझिकल, अब तक छप्पन, वेलकम यासारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या.

क्रांतिवीरमधील अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराने गौरविण्यात आले. अभिनयासोबतच त्यांनी दिग्दर्शन आणि लेखन क्षेत्रातही काम केले. भारत सरकारने २०१३ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले होते. हिंदी आणि मराठी चित्रपटांसोबतच रंगभूमीवरही त्यांनी आपल्या अभिनयाची छाप पाडली. खरे म्हणजे मूळचे ते रंगभूमी कलावंतच! नानाच्या निधनाने केवळ चित्रपटसृष्टीतील एक दिग्गज कलाकार हरपला नाही तर सामाजिक बांधिलकी जपणारा आणि शेतक-यांच्या प्रश्नासाठी प्रत्यक्ष मैदानात उतरलेला आधारवडही हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी कुटुंबासाठी नाना पाटेकर यांचे योगदान कायम स्मरणात राहणार आहे. नाना पाटेकर यांचे व्यक्तिमत्त्व केवळ अभिनयापुरते मर्यादित नव्हते. सामाजिक प्रश्नांविषयी असलेली त्यांची संवेदनशीलता त्यांच्या विविध उपक्रमांतून सातत्याने दिसून आली. २०१४-१५ मध्ये मराठवाडा आणि विदर्भ दुष्काळाच्या भीषण संकटातून जात होते, पाण्याची टंचाई, शेतीचे नुकसान आणि वाढत्या शेतकरी आत्महत्यांमुळे महाराष्ट्राचे समाजमन अस्वस्थ झाले होते. या परिस्थितीने नानांना अंतर्मुख केले.

त्यातूनच अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या साक्षीने शेतक-यांसाठी काम करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. सप्टेंबर २०१५ मध्ये नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या नावातील अद्याक्षरांवरून नाम फाऊंडेशनची स्थापना झाली. दुष्काळाने उद्ध्वस्त झालेल्या शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात देण्यापासून सुरू झालेली ही चळवळ पुढे अनेक व्यापक उपक्रमांपर्यंत पोहोचली. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवा आणि त्यांच्या मुलांच्या मदतीसाठी संस्थेने काम केले; मात्र नामचे कार्य केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित राहिले नाही. पाणी संवर्धन, पाणी अडवा, पाणी जिरवा, जलव्यवस्थापन, शेतकऱ्यांना मार्गदर्शन, विविध जलप्रकल्पांची उभारणी आणि त्यासाठी आवश्यक कामे यावर नामने भर दिला. ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी करण्यासाठी तसेच मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी संस्थेने उपक्रम राबवले त्यामुळे नाम फाऊंडेशन ही केवळ मदत करणारी संस्था न राहता हळूहळू एका व्यापक सामाजिक चळवळीचे रुप घेत गेली. नाम फाऊंडेशनने आतापर्यंत ७७ लाख १७ हजार शेतकऱ्यांना मदत केली आहे. यंदाही मोठा दुष्काळ पडल्याने, अशा कठीण काळात नानाचे निधन झाल्याने विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक कुटुंबांना आपल्या मदतीला धाऊन येणारा एक संवेदनशील आवाज हरपल्याची भावना आहे.

अभिनयाच्या पडद्यावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारा कलावंत नाना जाणे ही केवळ कलाविश्वाची हानी नसून शेतकरी आणि ग्रामीण समाजासाठी काम करणाऱ्या एका संवेदनशील व्यक्तिमत्त्वाची मोठी पोकळी निर्माण करणारी घटना ठरली आहे. नानाच्या मागे पत्नी नीलकांती पाटेकर आणि मुलगा मल्हार असा परिवार आहे. नाना पाटेकर ऊर्फ विश्वनाथ गजानन पाटेकर यांचा जन्म १ जानेवारी १९५१ रोजी रायगड जिल्ह्यातील मुरूड-जंजिरा येथे झाला. त्यांनी मुंबईचा सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्टस्मधून चित्रकलेचे शिक्षण घेतले होते. त्यांच्या अभिनयाची जडणघडण प्रायोगिक रंगभूमीवर झाली. विजया मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी नाटकांमध्ये काम करण्यास सुरुवात केली.

# कायदेशीर दहशतवाद आणि विवाहसंस्थेच्या बाजारामध्ये अडकलेले निष्पाप जीव

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारतीय संस्कृतीत विवाह ही दोन कुटुंबांना आणि कुटुंबातील व्यक्तींच्या मनांना जोडणारी एक अत्यंत पवित्र व्यवस्था मानली जाते. परंतु, आजच्या काळात या व्यवस्थेला भयंकर मोठी वाळवी लागली आहे. लग्नानंतर निर्माण होणाऱ्या कौटुंबिक वादांमध्ये महिलांच्या संरक्षणासाठी बनवलेल्या कायद्यांचा अत्यंत अमानुष आणि चुकीच्या पद्धतीने वापर करून पतीकडून अवाढव्य रकमेची मागणी केली जात आहे. हुंडाबळी (कलम ४९८ अ), घरगुती हिंसाचार आणि पोटगी यांसारख्या कायद्यांचा मूळ उद्देश खऱ्या अर्थाने पीडित महिलांना न्याय देणे हा होता. मात्र, जेव्हा केवळ वैयक्तिक राग काढण्यासाठी किंवा पैशांची उकळ करण्यासाठी याचा हत्यारासारखा वापर होतो, तेव्हा तो समाजव्यवस्थेसाठी १ मोठा धोका बनतो. देशाच्या सर्वोच्च न्यायालयानेही अशा प्रवृत्तीला 'कायदेशीर दहशतवाद' असे संबोधले आहे. खोट्या आरोपांमुळे केवळ त्या तरुणाचेच नव्हे, तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त होते. या कायद्यांच्या गैरवापरामुळे पतीची आर्थिक स्थिती, त्याच्यावरील कर्ज किंवा घरातील जबाबदाऱ्या यांचा कोणताही विचार न करता, तो लाख रुपये महिना कमावतो ना, मग तीन कोटी तर द्यावेच लागतील, नाही दिले तर थेट तुरुंगाची हवा खावी लागेल, अशी धक्कादायक आणि खंडणीखोर मानसिकता समाजात उघडपणे समोर येत आहे.

कुटुंबाचा मुख्य आधार असलेल्या तरुणाला तुरुंगात जाण्याची भीती दाखवून, त्याच्यावर दबाव टाकून कर्ज काढण्यास भाग पाडले जाते. आधीच कर्जात बुडालेला, मुलांचा किंवा घरातील आजारी व्यक्तींचा इलाज करणारा तरुण या अमानुष दबावामुळे पूर्णपणे कोलमडून पडतो. जोपर्यंत श्वास आहे तोवर कर्ज काढून मागण्या पूर्ण करायच्या आणि जेव्हा सर्व रस्ते बंद होतात, तेव्हा नैराश्यातून मृत्यूला कवटाळायचे, अशी विदारक स्थिती आज हजारो पुरुषांवर ओढवली आहे.

या भयानक वास्तवाचे एक अत्यंत ताजे आणि हृदयद्रावक उदाहरण ३ ऑक्टोबर २०२६ रोजी नोएडा येथे पाहायला मिळाले. नोएडा येथील सेक्टर ९४ मध्ये असलेल्या सर्वांत उंच ६८ मजली 'सुपरनोव्हा' सोसायटीत शनिवार, ३ ऑक्टोबर २०२६ रोजी एक अत्यंत धक्कादायक आणि वेदनादायी घटना घडली. गुरुग्रामच्या डीएलएफ सायबर हबमध्ये काम करणारा ३० वर्षीय आयटी इंजिनिअर संभव जैन याने आयुष्यातील संघर्ष आणि नैराश्यामुळे हताश होऊन या इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून उडी मारून आपले जीवन संपवले. ही घटना इतकी भयंकर होती की, १४० किलो वजन असलेल्या संभवचा मृतदेह खाली पार्किंगच्या छतावर आदळला आणि त्याचे दोन तुकडे झाले. एका होतकरू तरुणाचा असा दुर्दैवी अंत पाहणे हे समाजासाठी अत्यंत विचलित करणारे होते.

या घटनेतील सर्वांत हादरवून टाकणारा प्रसंग म्हणजे, जेव्हा संभव मृत्यूच्या दारात उभा होता, तेव्हा शेजारी काम करणाऱ्या ४ लोकांनी त्याला वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांनी त्याला बाल्कनीच्या आत ओढण्याची धडपड केली, परंतु जीवनाला पूर्णपणे कंटाळलेल्या संभवने त्यांचे हात झिडकारले. यावेळी त्याने बचावकर्त्यांना सांगितले की तो खूप मोठ्या नैराश्यात आहे आणि जर कोणी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला, तर तो त्यालाही आपल्यासोबत खाली ओढून नेईल. यानंतर त्याने स्वतःला मृत्यूच्या खाईत झोकून दिले.

या खळबळजनक अंतामागे एका हतबल माणसाच्या संघर्षाची अत्यंत मार्मिक कहाणी दडलेली आहे. लग्नानंतर आजारी आणि अपुऱ्या दिवसांच्या जन्मलेल्या मुलाच्या उपचाराच्या प्रचंड खर्चामुळे तो कर्जाच्या दलदलीत फसला होता. या आर्थिक ताणतणावांमुळे त्याचे घर मोडले आणि पत्नीसोबत गेल्या ८ महिन्यांपासून घटस्फोटाचा वाद सुरू होता. कौटुंबिक कलहामुळे पत्नी ५ महिन्यांपूर्वीच माहेरी निघून गेली होती. २०२५ मध्ये होणाऱ्या घटस्फोटाच्या तडजोडीसाठी पत्नीला तब्बल ३ कोटी रुपये देण्याच्या अवाढव्य दबावाने त्याला आतून पूर्णपणे पोखरून टाकले होते, ज्यापैकी १ कोटी रुपये त्याने दिलेही होते.

आत्महत्येपूर्वी संभवच्या वडिलांनी त्याला जवळपास ६० वेळा फोन केले होते, पण त्याने एकही कॉल उचलला नाही. त्याऐवजी त्याने आपल्या वडिलांना ८० पेक्षा जास्त व्हॉट्सअप मेसेज पाठवले. या मेसेजेसमध्ये त्याने आपल्यावरील प्रचंड कर्ज, मुलाचा आजार आणि आयुष्यातील इतर समस्यांची आपबीती विदारक शब्दांत मांडली. याव्यतिरिक्त, उडी मारण्यापूर्वी त्याने दोन मिनिटे आणि ४० सेकंदांचा एक व्हिडिओ रेकॉर्ड केला आणि त्यानंतर आपला मोबाईल बंद केला. वडिलांना पाठवलेला त्याचा शेवटचा मेसेज कोणाचेही हृदय पिळवटून टाकणारा होता. त्याने अत्यंत उद्विग्न अवस्थेत लिहिले होते, "सतत होणारा खर्च आणि कर्जामुळे मी अत्यंत त्रस्त आहे... आता कोणी पैसे मागितले तर त्यांना सांगून द्या की, तो मेला."

आर्थिक चणचण आणि कौटुंबिक नात्यांच्या ओझ्याखाली दबून एका तरुणाने अशा प्रकारे जीवन संपवणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. या घटनेनंतर समाजमाध्यमांवर एका भावनिक पोस्टद्वारे महिलांना कळकळीचे आवाहन करण्यात आले आहे की, ज्याप्रमाणे मुली आपल्या वडिलांना त्यांच्या गरिबीत किंवा कठीण काळात खंबीरपणे साथ देतात, तसाच आधार आपल्या पतीलाही देणे गरजेचे आहे. जर ते शक्य नसेल, तर स्वतःच्या पायावर उभे राहण्याची क्षमता बाळगा, परंतु कुणाचा जीव जाईल एवढा दबाव टाकू नका. मानसिक ताणतणाव आणि आर्थिक ओझे माणसाला किती टोकाचे पाऊल उचलण्यास भाग पाडू शकते, हे या घटनेवरून स्पष्ट होते.

अशीच एक मन सुन्न करणारी घटना याआधी डिसेंबर २०२४ मध्ये बंगळुरू येथे घडली होती. अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या खोट्या केसेस आणि कायदेशीर व्यवस्थेच्या छळाला कंटाळून आपले जीवन संपवले होते. मृत्यूला कवटाळण्यापूर्वी अतुलने २४ पानांची चिठ्ठी आणि ८१ मिनिटांचे चलचित्र (व्हिडिओ) बनवून आपला मानसिक छळ आणि न्यायव्यवस्थेतील त्रुटी जगासमोर मांडल्या होत्या. याच बंगळुरू शहरात सय्यद मखदूम या तरुणानेही ५० लाख रुपयांच्या खंडणीला आणि खोट्या आरोपांना कंटाळून आपला जीव दिला होता. या घटना केवळ वैयक्तिक आत्महत्या नसून, त्या आपल्या व्यवस्थेतील मोठ्या त्रुटींचे, कायद्याच्या गैरवापराचे आणि सामाजिक असंवेदनशीलतेचे भयानक परिणाम आहेत.

राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाची आकडेवारी पाहिल्यास विवाहित पुरुषांच्या आत्महत्येचे प्रमाण चिंताजनक आहे. पुरुष कधीच रडत नाहीत या चुकीच्या सामाजिक धारणेमुळे पुरुषांना आपले दुःख आणि घुसमट उघडपणे व्यक्त करता येत नाही. एका निष्पाप व्यक्तीला केवळ त्याच्या लिंगामुळे अशा अमानुष छळाला सामोरे जावे लागणे, हा मानवाधिकारांचा १ मोठा आणि गंभीर भंग आहे. अनेक प्रकरणांमध्ये पोटगीच्या रकमेसोबतच पुरुषांना त्यांच्याच जन्मदात्या मुलांपासून दूर ठेवले जाते. स्वतःच्या मुलाला भेटण्यासाठी न्यायालयाच्या चकरा मारून आणि तारखांवर तारखा मिळून अनेक तरुण आतून तुटतात.

जेव्हा हुंडाबळी किंवा घरगुती हिंसाचाराचा कायदा कमी पडतो असे वाटते, तेव्हा काही प्रकरणांमध्ये पतीच्या वृद्ध आई-वडिलांवर किंवा भावावर विनयभंगाचे खोटे गुन्हे दाखल केले जातात. आपल्यामुळे आपल्या कुटुंबाला आणि वृद्ध आई-वडिलांना पोलीस ठाण्याची पायरी चढावी लागत आहे, या अपराधी भावनेतून अनेक तरुण मृत्यूला जवळ करतात. या वाढत्या घटनांमुळे आजच्या तरुण वर्गाचा विवाहसंस्थेवरील विश्वास वेगाने उडत चालला आहे.

या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी न्यायव्यवस्थेत आणि प्रशासकीय पातळीवर काही अत्यंत कठोर आणि ठोस पावले उचलणे आता काळाची गरज बनली आहे. महिला आयोगाच्या धर्तीवर पुरुषांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी, त्यांना कायदेशीर आणि मानसिक मदत देण्यासाठी राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर 'पुरुष हक्क आयोग' स्थापन होणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच, घटस्फोटाच्या वेळी पोटगी ठरवताना केवळ भावनांचा विचार न करता, पतीची एकूण आर्थिक स्थिती, त्याच्यावरील गृहकर्ज, शैक्षणिक कर्ज, वैद्यकीय कर्ज आणि इतर कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा कायदेशीररीत्या आणि पारदर्शकपणे विचार होणे बंधनकारक असायला हवे. जे लोक केवळ पैशांसाठी आणि सूडबुद्धीने खोटे गुन्हे दाखल करतात, त्यांच्यावर तत्काळ आणि कठोर दंडात्मक कारवाई करण्याची स्पष्ट तरतूद कायद्यात असली पाहिजे.

जोपर्यंत आपले कायदे केवळ लिंगभेदावर आधारित न राहता, खऱ्या अर्थाने सत्यावर आणि न्यायावर आधारित असणार नाहीत, तोपर्यंत संभव जैन आणि अतुल सुभाष यांच्यासारखे निष्पाप बळी जाणे थांबवणे अत्यंत कठीण आहे. समाजाचा आणि कायदेव्यवस्थेचा हा दृष्टिकोन बदलला, तरच विवाहसंस्थेचे पावित्र्य टिकेल आणि निष्पाप तरुणांचे प्राण वाचवता येतील.

- ९५६१५९४३०६

# जिवंतपणीच ज्येष्ठांना सन्मानाची वागणूक मिळायला हवी!

रवींद्र गोविंद पांडे
नागपूर

सध्या पितृपक्ष पंधरवडा सुरू आहे.या पंधरवाड्यात आपल्या घरातील पितरांच्या नावाने त्यांच्या तिथीला वा सर्व पितृपक्ष अमावास्येला पिंडदान किंवा इतर दान केले जाते. काही ठिकाणी तर घरातील पितरांच्या सोबतच देश जडनघडणीत ज्यांचा मोलाचा वाटा उचलत त्यांनी आपण प्राण पणाला लावले अशांना सुध्दा त्यांच्या नावाने पिंडदान करून वा इतर कार्यक्रम आयोजित करून त्यांचे प्रती संवेदना,भावना व्यक्त केल्या जाऊन श्रद्धांजली वाहण्यात येते.

भारतीय समाज,व्यक्ती ही अध्यात्मिक आणि धार्मिक म्हणून ओळखली जाते.या समाजाची तशी श्रध्दा आहे.ही श्रध्दा त्याच्या वागण्यातून, कृतीतून बोलण्यातून सतत जाणवत असते. भारतीय व्यक्तीच्या मनावर झालेला तो एकप्रकारचा संस्कार आहे. त्यामुळे आजही कोणत्याही भारतीय व्यक्तीच्या घरी एखादे शुभ कार्य करण्यापूर्वी आपल्या पूर्वजांच्या प्रतिमेला माल्यांपर्ण करून त्यांचे प्रती आदरांजली वाहण्यात येते. त्यांना या शुभकार्यासाठी आवतन दिले जाते.

समाजात एकीकडे चांगले असे चित्र दिसून येत असतांना दुसरीकडे मात्र आपल्या घरातीलच हयात असलेल्या ज्येष्ठांना मिळणाऱ्या विचित्र, सापत्न वागणूकीने मात्र मन हेलावून जातं.घरातील हे ज्येष्ठ सदस्य ज्यांनी त्यांच्या आयुष्यात रक्ताचे पाणी करून कुटुंबाला घडवले.त्यांचेच आयुष्याच्या शेवटच्या काळात हाल होतांनाचे अनेक उदाहरणे देता येतील. ज्या भारत देशात मृत पावलेल्या व्यक्तींसाठी श्राद्ध कर्म केले जाते,त्याच देशात जिवंत असलेल्या वृद्धांसाठी " सर्वाधिक वृध्दाश्रम " असणं हे कशाचे लक्षण मानायचे? समाजात वृध्दाश्रम असणे हे सुदृढ कुटुंब व्यवस्थेचे लक्षण नाहीच. समाजात वृध्दाश्रम असणं हेच खरं म्हणजे लज्जास्पद आहे. हे आपल्या कुटुंब व्यवस्थेलाच काळीमा फासणारे आहे असे म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही.ज्यांना आधार नाही त्यांच्यासाठी वृध्दाश्रम असणं गरजेचं आहे.आवश्यक आहे. पण ज्यांच्या घरात ज्येष्ठांना सांभाळायला सदस्य आहेत त्यांनी तर याचा विचारही मनात येऊ द्यायला नको.

घरातील जे ज्येष्ठ व्यक्ती मृत झाल्यावर त्यांना पुज्य मानले जात पुजा केली जाते घरातील लोकांना तेच जिवंतपणी जड का बरं झाल्यासारखे वाटतात याचे कारण अद्याप समजू शकले नाही. जिवंतपणी त्यांच्याप्रती चांगली वागणूक दिली,आदर केला तर नंतर तेच घरातील इतर सदस्यांना निश्चितपणे कुठेही कमी पडू देणार नाही. पण जे समोर असतांना अपमान करतात अन् मागे भितीपोटी मानाचे ( किंवा इतरांना दाखवण्यासाठी ) स्थान द्यायचे हे योग्य नाही. बरोबर आहे ना!

- ९३२५४५७०५२

# भुवनेश्वर तर संघात परतला; शमीसाठीही दरवाजे उघडणार?

## आर. पी. सिंग आणि प्रग्यान ओझा यांच्या भूमिकेची चर्चा, २०२७ च्या विश्वचषकासाठी अनुभवी गोलंदाजांची गरज

डॉ. दत्ता विघावे
क्रिकेट समीक्षक

भारतीय क्रिकेटमध्ये एखाद्या खेळाडूला राष्ट्रीय संघात स्थान मिळवणे जितके कठीण असते, तितकेच संघाबाहेर गेल्यानंतर पुन्हा पुनरागमन करणे आव्हानात्मक असते. वय, तंदुरुस्ती, दुखापती, युवा खेळाडूंची वाढती स्पर्धा आणि निवड समितीचे प्राधान्यक्रम अशा अनेक कसोट्यांवर स्वतःला सिद्ध करावे लागते. त्यामुळे जवळपास चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारचे भारतीय टी-२० संघात झालेले पुनरागमन महत्त्वाचे ठरले आहे. त्याच्या पुनरागमनामुळे आता आणखी एका अनुभवी वेगवान गोलंदाजाच्या, म्हणजेच मोहम्मद शमीच्या भारतीय संघातील पुनरागमनाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मात्र, भुवनेश्वरसाठी उघडलेले दरवाजे शमीसाठीही खुले होणार का? हा खरा प्रश्न आहे.

भुवनेश्वर कुमारने नोव्हेंबर २०२२ नंतर प्रथमच भारतीय टी-२० संघात पुनरागमन केले आहे. आयपीएलमधील प्रभावी कामगिरी, चेंडू स्विंग करण्याची क्षमता, अचूक टप्पा आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा अनुभव यांमुळे त्याची निवड चर्चेचा विषय ठरली. त्याच्या पुनरागमनातून एक महत्त्वाचा संदेश मिळतो : अनुभवी खेळाडूची कारकीर्द संपली असे केवळ तो काही काळ संघाबाहेर राहिला म्हणून मानता येत नाही. वर्तमानातील कामगिरी आणि संघाची गरज यांवर त्याच्या पुनरागमनाची शक्यता अवलंबून असते.

भुवनेश्वर हा नवीन चेंडूने प्रतिस्पर्धी फलंदाजांना अडचणीत आणणारा गोलंदाज आहे. स्विंग, अचूक टप्पा, वेगातील बदल आणि दबावाच्या परिस्थितीत गोलंदाजी करण्याची क्षमता ही त्याची बलस्थाने आहेत. वेगवान गोलंदाजी म्हणजे केवळ चेंडूचा वेग नव्हे, तर फलंदाजाच्या कमकुवत बाजूचा अभ्यास करून योग्य चेंडू टाकण्याचे कौशल्यही तितकेच महत्त्वाचे असते. भुवनेश्वरच्या पुनरागमनामुळे अनुभव आणि गुणवत्तेचा योग्य वापर केल्यास संघाला फायदा होऊ शकतो, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर मोहम्मद शमीच्या पुनरागमनाची चर्चा महत्त्वाची ठरते. शमी हा भारतीय वेगवान गोलंदाजीचा हुकमी एक्का राहिला आहे. सीमची हालचाल, चेंडू टप्प्यावर पडल्यानंतर दिशा बदलण्याची क्षमता आणि महत्त्वाच्या क्षणी बळी मिळवण्याचे कौशल्य यांमुळे त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

२०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात शमीने अवघ्या सात सामन्यांत २४ बळी मिळवून स्पर्धेतील सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज होण्याचा मान मिळवला. सुरुवातीच्या सामन्यांत अंतिम संघात स्थान न मिळाल्यानंतर संधी मिळताच त्याने आपल्या गोलंदाजीने प्रतिस्पर्धी संघांची फलंदाजी उद्ध्वस्त केली. त्यानंतरच्या चॅम्पियन्स करंडक स्पर्धेतही त्याने भारताच्या विजेतेपदाच्या मोहिमेत योगदान दिले. या कामगिरीवरून त्याची गुणवत्ता आणि मोठ्या स्पर्धांमध्ये बळी मिळवण्याची क्षमता स्पष्ट होते.

मात्र, शमीच्या पुनरागमनाच्या मागातील सर्वांत मोठे आव्हान त्याची सध्याची तंदुरुस्ती हे आहे. वेगवान गोलंदाजाला केवळ काही सामन्यांत बळी मिळवता आले म्हणून तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील संपूर्ण भार पेलण्यास सज्ज आहे, असे म्हणता येत नाही. त्याचा गोलंदाजीतील वेग, सलग षटके टाकण्याची क्षमता, सामन्यानंतरची शारीरिक पुनर्प्राप्ती आणि दुखापत पुन्हा होण्याचा धोका यांचे मूल्यमापन आवश्यक आहे. देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरी, आयपीएलमधील प्रभाव आणि वैद्यकीय पथकाचा अहवाल या सर्व बाबींचा विचार करूनच त्याच्या पुनरागमनाचा निर्णय घ्यावा लागेल.

भुवनेश्वरच्या पुनरागमनाच्या चर्चेत माजी भारतीय वेगवान गोलंदाज आर. पी. सिंग आणि माजी फिरकीपटू प्रग्यान ओझा यांच्या भूमिकेकडेही लक्ष वेधले जात आहे. वृत्तांनुसार, आर. पी. सिंग यांनी भुवनेश्वरच्या निवडीसाठी पाठपुरावा केला होता. अजित आगरकर यांचा मुख्य निवडकर्तापदाचा कार्यकाळ संपल्यानंतर प्रग्यान ओझा अंतरिम अध्यक्ष म्हणून निवड प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचेही वृत्त आहे. या घडामोडींमुळे अनुभवी खेळाडूंच्या निवडीबाबत समितीतील विचारविनिमयाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

आर. पी. सिंग यांना वेगवान गोलंदाज म्हणून आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा अनुभव आहे. वेगवान गोलंदाजाचे मूल्यमापन करताना केवळ वेग नव्हे, तर स्विंग, सीमची हालचाल, टप्पा आणि दबावाखाली गोलंदाजी करण्याची क्षमता यांचा विचार करावा लागतो. त्यामुळे भुवनेश्वरच्या उपयुक्ततेविषयी त्यांचा दृष्टिकोन महत्त्वाचा ठरू शकतो. प्रग्यान ओझा यांच्यासमोरही युवा खेळाडूंना संधी देताना अनुभवी खेळाडूंच्या गुणवत्तेचा योग्य वापर करण्याचे आव्हान आहे.

तथापि, भुवनेश्वरच्या निवडीसाठी या दोघांनी घेतलेली भूमिका म्हणजे शमीच्या पुनरागमनालाही त्यांचा पाठिंबा आहे, असा निष्कर्ष काढता येणार नाही. शमीबाबत त्यांची अधिकृत भूमिका स्पष्ट झाल्याशिवाय तसा दावा करणे योग्य ठरणार नाही. मात्र, भुवनेश्वरच्या निवडीने अनुभवी खेळाडूंच्या कामगिरीचा नव्याने विचार करण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे, असे म्हणता येईल.

भारताचा माजी फिरकीपटू रविचंद्रन अश्विन यानेही भुवनेश्वरच्या पुनरागमनानंतर शमीसाठी संधी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे मत व्यक्त केले आहे. अश्विनच्या मतामुळे या चर्चेला आणखी बळ मिळाले. मात्र, माजी खेळाडूंची मते आणि निवड समितीचा अधिकृत निर्णय यांत फरक आहे. शमीला प्रत्यक्ष संधी मिळणार की नाही, हे त्याची तंदुरुस्ती, अलीकडील कामगिरी आणि संघाच्या गरजांवरच अवलंबून राहील.

या संपूर्ण चर्चेला २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाची पार्श्वभूमी आहे. दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे होणाऱ्या या स्पर्धेसाठी भारताला सक्षम आणि अनुभवी वेगवान गोलंदाजीची फळी तयार ठेवावी लागेल. दक्षिण आफ्रिकेतील खेळपट्ट्यांवर मिळणारी उसळी आणि चेंडूची हालचाल लक्षात घेता शमीसारख्या गोलंदाजाची उपयुक्तता महत्त्वाची ठरू शकते. २०२३ च्या विश्वचषकातील त्याची कामगिरी त्याच्या क्षमतेची साक्ष देते. मात्र, आगामी स्पर्धेत त्याला स्थान मिळवायचे असेल, तर वर्तमानातील तंदुरुस्ती आणि कामगिरीच्या कसोटीवर उतरावे लागेल.

जसप्रीत बुमराहवरील कामाचा भार नियंत्रित ठेवताना सिराज, शमी, भुवनेश्वर आणि युवा वेगवान गोलंदाज यांच्यापैकी योग्य पर्याय तयार ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक खेळाडूची भूमिका वेगळी असते. शमी बळी मिळवण्यात प्रभावी ठरू शकतो, तर भुवनेश्वर स्विंग आणि अचूकतेच्या जोरावर उपयुक्त ठरू शकतो. मात्र, टी-२० संघातील निवड म्हणजे एकदिवसीय विश्वचषकासाठीची निवड निश्चित झाली, असे समजता येणार नाही. दोन्ही प्रकारांसाठी खेळाडूंची उपयुक्तता स्वतंत्रपणे तपासावी लागेल. भारतीय निवड समितीने शमीच्या बाबतीत तीन बाबींना प्राधान्य द्यावे : त्याची तंदुरुस्ती, अलीकडील सामन्यांतील कामगिरी आणि आगामी स्पर्धांसाठीची उपयुक्तता. या निकषांवर तो योग्य ठरत असेल, तर त्याला संधी नाकारण्याचे कारण दिसत नाही. त्याचवेळी केवळ पूर्वीच्या पराक्रमांच्या आधारे त्याची निवड करणेही योग्य ठरणार नाही. भारतीय संघाला अनुभव आणि युवा गुणवत्तेची सांगड घालावी लागेल.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# दीक्षाभूमीवरील सुविधांची कामे वेळेत पूर्ण करावी !

## धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी परिसरात उभारण्यात येणाऱ्या आवश्यक सोयी-सुविधांचा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज आढावा घेतला. दीक्षाभूमी परिसरात अनुयायांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करता याव्या यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सादर केलेल्या ८ कोटी ९२ लक्ष रुपयांचा आराखड्यास मुख्यमंत्र्यांनी मंजुरी प्रदान केली असून यंदा प्रथमच सर्व अत्याधुनिक व सुसज्ज सुविधांची निर्मिती करण्यात येत आहे. सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कामे पूर्ण करून येथे येणाऱ्या अनुयायांसाठी उत्तम सोयीसुविधा पुरविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीस पोलीस उपायुक्त एस. ऋषिकेश रेड्डी, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण तसेच संबंधित विभाग प्रमुख व दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते. अनुयायांसाठी उभारण्यात येणाऱ्या विविध सुविधांच्या अंमलबजावणीवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त निर्माण करण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा व व्यापक व्यवस्थेसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या पुढाकाराने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून प्रथमच सुमारे ८ कोटी ९३ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येत असून त्यातून येथे अनुयायांसाठी तात्पुरते निवारा केंद्र, पुरेशा प्रकाशासाठी एलईडी व्यवस्था, शुद्ध पाण्याचे नियोजन, स्वच्छता आणि फिरती शौचालये यांसारख्या सुविधांची निर्मिती करण्यात येणार आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित दसरा महोत्सवादरम्यान येथे देशभरातून लाखो अनुयायी येत असतात. यादरम्यान येथील वीज पुरवठा अखंडित सुरू राहावा तसेच दीक्षाभूमीचे मुख्य प्रवेशद्वार (पूर्व गेट), सभागृह, राहाटे कॉलनी, पीकेव्ही वसतिगृह, आयटीआय कॉलेज तसेच परिसरात ठिकठिकाणी वीज जोडणी व देखरेखीसाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना केल्या.

परिसरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर भर देत कचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध मनुष्यबळाचा वापर करत स्वच्छता राखण्याच्या सूचना व पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून आपत्कालीन परिस्थितीसाठी पर्यायी व्यवस्था उभारण्यासह इतर तांत्रिक कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी संबंधितांना दिले. या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण योग्य पद्धतीने करण्यात यावे. येथील परिसराची माहिती दर्शवणारे सूचना फलक, होर्डिंग्ज व क्यूआर कोड ठिकठिकाणी लावण्याच्या सूचना श्री आशीर्वाद यांनी केल्या.

दीक्षाभूमी परिसर, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसर, सामाजिक न्याय भवन, आयटीआय परिसर, माता कचेरी, बेझन बाग, ड्रॅगन पॅलेस कुर्वेज शाळा परिसर आदी ठिकाणी जर्मन हँगर स्वरूपाचे आधुनिक, सुविधाजनक व प्रशस्त डोम उभारण्यात येणार आहेत. त्याची पाहणी करत येथील परिसरात इंटरनेट व वीज जोडणी, स्वच्छतागृहे व विविध सुविधांबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना निर्देश दिले.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर देशभरातून लाखो अनुयायी येत असतात. यंदा दसरा २० ऑक्टोबर रोजी असून १८ ते २१ ऑक्टोबर या कालावधीत येथील परिसरात सर्वाधिक गर्दी अपेक्षित आहे. त्यादृष्टीने येथे निर्माण करण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा व व्यापक व्यवस्थेची जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पाहणी केली. दीक्षाभूमी परिसरात मुरुमीकरणाचे काम सुरु असून या कामांसाठी समाज कल्याण विभाग कार्यान्वयन यंत्रणा म्हणून काम पाहत आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत आज या परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून सद्यस्थितीचा आढावा घेतला. दीक्षाभूमी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसरातील व्यवस्थेची पाहणी करून आवश्यक त्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना केल्या.

## नवरात्रोत्सव व धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या तात्पुरत्या वीजजोडणीसाठी 'प्रीपेड स्मार्ट मीटर' बंधनकारक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

आगामी नवरात्रोत्सव, दुगार्पूजा, गरबा महोत्सव तसेच दीक्षाभूमीवरील ५६ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक मंडळे, अन्नदान व विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी तात्पुरती वीजजोडणी घेणे अधिक सुलभ करण्यात आले आहे. यावर्षी सर्व प्रकारच्या तात्पुरत्या वीजजोडणीसाठी महावितरणतर्फे 'प्रीपेड स्मार्ट मीटर' बसवणे पूर्णपणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे आयोजकांना आपल्या गरजेनुसार मोबाईल रिचार्जप्रमाणे आधी रक्कम भरून वीज वापराचा लाभ घेता येणार आहे. ऐन उत्सवाच्या काळात वीजपुरवठ्याची कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी आयोजकांनी व ग्राहकांनी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा मोबाईल अँपद्वारे वेळेत ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन महावितरण नागपूर परिमंडलातर्फे करण्यात आले आहे.

धार्मिक व सामाजिक उत्सवांचा उत्साह द्विगुणित करताना वीजपुरवठा अधिक पारदर्शक व जलद गतीने उपलब्ध व्हावा, या उद्देशाने महावितरणने विशेष तयारी केली आहे. परिपूर्ण ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित मंडळाला अवघ्या ४८ तासांच्या आत तात्पुरती वीजजोडणी मंजूर करून दिली जाणार आहे. गतवर्षी नागपूर परिमंडलात तब्बल ८० हून अधिक नवरात्रोत्सव व दुगार्पूजा मंडपांना अधिकृत तात्पुरता वीजपुरवठा करण्यात आला होता. यावर्षी देखील मोठ्या संख्येने अर्ज येण्याची शक्यता गृहीत धरून महावितरणची सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. उत्सव काळात वीजपुरवठ्याबाबत कोणत्याही अचानक उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींवर तत्काळ मात करण्यासाठी आणि ग्राहकांना अखंडित सेवा देण्यासाठी महावितरणकडून विशेष व्यवस्था करण्यात येणार आहेत.

मंडपातील भव्य देखावे, मनमोहक विद्युत रोशणाई, ध्वनिक्षेपक, गरबा प्रांगण, महाप्रसाद तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विविध ठिकाणी आयोजित परित्राण पाठ व अन्नदान कार्यक्रमांसाठी वीज वापरताना सुरक्षेची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा अनधिकृत वीजजोडणी, सदोष किंवा उघडी वायरिंग, तसेच मंजूर भारापेक्षा अधिक विद्युत उपकरणांचा अचानक वापर केल्याने शॉर्ट सर्किट होऊन अपघाताचा गंभीर धोका निर्माण होतो. यामध्ये जीवित व वित्तहानी होण्याची मोठी शक्यता असते. त्यामुळे सर्व आयोजक मंडळांनी कोणत्याही प्रकारची अनधिकृत वीजचोरी किंवा धोकादायक जोडणी न करता महावितरणकडून रीतसर तात्पुरती वीजजोडणी घ्यावी आणि सुरक्षित वीज वापराच्या सर्व नियमांचे तंतोतंत पालन करून महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## टिपू सुलतान चौक परिसरात सिव्हरलाईनवरील अतिक्रमण हटविले

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या आशी नगर झोन क्र. ०९ अंतर्गत अतिक्रमण निर्मूलन पथकाद्वारे टिपू सुलतान चौक, अफगान दरबार हॉटेलच्या बाजूला सिव्हरलाईनवर करण्यात आलेले अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली. सदर परिसरातील नागरिकांनी सिव्हरलाईनवर तसेच तिच्या जागेत स्वच्छतागृह व स्वयंपाकघराचे बांधकाम करून अतिक्रमण केले होते. त्यामुळे सिव्हरलाईनच्या स्वच्छतेमध्ये व गाळ काढण्याच्या कामामध्ये अडथळा निर्माण होत होता.



महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने सदर अतिक्रमण हटवून सिव्हरलाईनची जागा मोकळी केली. या कारवाईमुळे सिव्हरलाईनची स्वच्छता व गाळ काढण्याचे काम सुरळीतपणे करता येणार असून, सांडपाणी निचऱ्याची व्यवस्था सुधारण्यास मदत होणार आहे. सदर कारवाई नागपूर महानगरपालिकेच्या आशी नगर झोन क्र. ०९ मार्फत करण्यात आली.

## दादासाहेब बालपांडे कॉलेजच्या प्लेसमेंट ड्राइव्हला उत्स्फूर्त प्रतिसाद, १०५ उमेदवारांना रोजगाराची संधी

### १,९०० उमेदवारांची नोंदणी, ६०० हून अधिक उमेदवारांचा सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

बेसा येथील, दादासाहेब बालपांडे कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलतर्फे ७ ऑक्टोबर रोजी आयोजित पूल कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमासाठी डी. फार्म, बी.फार्म. आणि एम. फार्म. पात्रता असलेल्या १,९०० उमेदवारांनी नोंदणी केली, तर ६०० हून अधिक उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखत प्रक्रियेत सहभाग घेतला. यापैकी १९७ उमेदवारांची पुढील निवड प्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून, सुमारे १०५ उमेदवारांना रोजगाराची संधी मिळाली.



या भरती उपक्रमात Chemfild Cellulose Pvt. Ltd., Shree Baidyanath Ayurved Bhavan Pvt. Ltd., Nitika Pharma, Apollo Pharmacy, Unijules Life Sciences आणि CV Healthcare Pvt. Ltd., Nagpur या नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. उत्पादन, गुणवत्ता हमी, गुणवत्ता नियंत्रण, संशोधन व विकास, केमिस्ट, फार्मासिस्ट आणि बिझनेस एक्झिक्युटिव्ह अशा विविध पदांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. कंपन्यांच्या मानव संसाधन व्यवस्थापकांनी आणि तांत्रिक तज्ज्ञांनी उमेदवारांचे शैक्षणिक ज्ञान, तांत्रिक कौशल्ये व व्यावसायिक पात्रतेच्या आधारे निवड प्रक्रिया राबविली.

तसेच विद्यार्थ्यांना औषधनिर्माण व आरोग्यसेवा क्षेत्रातील करिअरच्या संधी आणि उद्योगक्षेत्राच्या अपेक्षांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाचे समन्वयन महाविद्यालयाच्या सहयोगी प्राध्यापक तथा प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलच्या सचिव डॉ. संध्या बागडे यांनी केले. अंबे दुर्गा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मनोज बालपांडे आणि महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. उज्वला महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॉ.विद्या साबळे, डॉ. अजय पिसे, डॉ. अमोल वारोकार, डॉ. पी.एस.गंगणे, डॉ. मंगेश गोडबोले, डॉ. रितेश फुले, डॉ.सचिन मोरे, डॉ. अश्विनी इंगोले, सचिन मेंढी, डॉ.देवेश्री नांदुरकर, सुश्री मंजुषा चारडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. या प्लेसमेंट ड्राइव्हमुळे फार्मसी क्षेत्रातील पात्र उमेदवारांना नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत झाली.

## जंतर-मंतरवर होणार ओबीसी कॉलम साठी १४ डिसेंबर ठिय्या आंदोलन आणि १५ डिसेंबरला संसदेवर महामोर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, नवी दिल्ली**

राष्ट्रीय ओबीसी महासंघ, बीसी वेल्फेअर असोसिएशन तेलंगणा आणि आंध्र प्रदेश व देशातील ओबीसी संघटना यांची बैठक कॉन्स्टिट्यूशन क्लब नवी दिल्ली येथे बैठक घेण्यातआली या बैठकीला देशभरातून पदाधिकारी उपस्थित होते यामध्ये प्रामुख्याने बिहारचे खासदार पप्पू यादव, सीपीएमचे माजी खासदार डी, राजा, हरियाणाचे माजी खासदार राजकुमार सैनी, तेलंगानाचे माजी खासदार वी. हनुमंतराव सामाजिक कार्यकर्ते योगेंद्र यादव राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ बबनराव तायवाडे, बीसी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष जाजुला श्रीनिवास गौड, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर, आंध्रप्रदेशचे अध्यक्ष केसना शंकरराव, छत्तीसगडचे माजी आमदार लेखराम शाहू, महाराष्ट्र आयोगाचे माजी सदस्य इकबाल अन्सारी, ग्यानी झेलसिंगचे नातू पंजाबचे इंद्रजीत सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत मध्ये कॉन्स्टिट्यूशन क्लब नवी दिल्ली येथे बैठक घेण्यात आली.




या बैठकीत ओबीसी कॉलम साठी हिवाळी अधिवेशन दरम्यान १४ डिसेंबर जंतर मंतर वर ठिय्या आंदोलन आणि १५ डिसेंबर ला संसदेवर महामोर्चा चे नियोजन बैठकीत करण्यात आले आहे, भारत सरकारने राजपत्राच्या प्रश्नावली मध्ये ओबीसी साठी स्वतंत्र्य कॉलम ची सूची नसल्याने,२०२७ जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलमचा समावेश करण्यात यावा, या मागणीसाठी दिल्ली येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान करण्यात येणार आहे.

जनगणनेत ओपन एंडेड प्रश्न विचारले असुन त्याऐवजी ड्राफ्ट डाउन सूची तयार करून, २०२७ जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलमचा समावेश करण्यात यावा, केंद्रात स्वतंत्र मंत्रालय स्थापित करण्यात यावे, १३ सप्टेंबर २०१७ पासून क्रिमिलीअरची मर्यादा वाढली नाही आहे. ती वाढविण्यात यावी, महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात यावा या मागणीसाठी आंदोलन व महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे, संतोष गुप्ता, संजय शाहू, शिवप्रसाद शहा, शरद वानखेडे, गुणेश्वर आरिकर, संजय ढवस, प्रकाश भागरथ, सूरज बेलोकर, शकील पटेल, सतपाल सोखी, रवी झाडे, मुकेश पुडके, सुभाष फेरम रत्नमाला पिसे, निरुपमा ब्रम्हे, बीसी वेल्फेअर असोसिएशनचे पदाधिकारी विक्रम गौड, शाम कुर्मा, क्रांती कुमार, नागेश्वर राव,मनी मंजिरी आणि ओबीसी संघटनाचे महाराष्ट्र, तेलंगाना, आंध्रप्रदेश, छत्तीसगड पंजाब, मध्यप्रदेश, दिल्ली प्रदेश, बिहार, हरियाणा, उत्तर प्रदेश या राज्यातील ओबीसी बांधव उपस्थित होते.

### थोडक्यात

## नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून प्रा. देवराम नंदनवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल

### बहुजन, वंचित, भटके- विमुक्त, आदिवासी व मागासवर्गीय घटकांच्या प्रतिनिधित्वाचा निर्धार



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रा. देवराम नंदनवार यांनी गुरुवारी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केला. बहुजन, वंचित, भटके- विमुक्त, आदिवासी तसेच मागासवर्गीय घटकांच्या प्रश्नांना विधान परिषदेच्या वरिष्ठ सभागृहात प्रभावीपणे मांडण्यासाठी आपण निवडणूक रिंगणात उतरलो असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. उमेदवारी अर्ज दाखल करताना विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, शिक्षक आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजातील वंचित व मागास घटकांना राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, तसेच शिक्षण, रोजगार, विद्यार्थी व शिक्षकांचे प्रश्न, युवकांच्या अडचणी आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांना प्राधान्य मिळावे, अशी भूमिका प्रा. नंदनवार यांनी व्यक्त केली. प्रा. नंदनवार हे विद्यार्थी, शिक्षक व सामाजिक प्रश्नांशी सातत्याने जोडलेले असून, विविध शैक्षणिक व सामाजिक विषयांवर त्यांनी भूमिका मांडली आहे. विविध सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांच्या आग्रहानंतर त्यांनी पदवीधर मतदार संघातून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.

त्यांच्या उमेदवारीला विविध सामाजिक घटकांकडून मिळत असलेल्या पाठिंब्यामुळे समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. पदवीधरांचा आवाज तसेच बहुजन, वंचित, भटके-विमुक्त, आदिवासी आणि मागासवर्गीय समाजाच्या प्रश्नांना विधान परिषदेत प्रभावीपणे मांडण्याचा निर्धार प्रा.नंदनवार यांनी यावेळी व्यक्त केला.

## नागपूरच्या पूजा धोटे यांनी दुबईत उंचावला भारताचा मान

### WNBF UAE Pro Show मध्ये बिकिनी मॉडेल बॉडीबिल्डिंग प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व, आंतरराष्ट्रीय मंचावर चमकदार कामगिरी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या प्रतिभावान बिकिनी मॉडेल आणि नैसर्गिक शरीरसौष्ठवपटू पूजा धोटे यांनी दुबई, संयुक्त अरब अमिराती येथे आयोजित WNBF UAE Pro Show या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून देशाचा गौरव वाढविला. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत त्यांनी बिकिनी मॉडेल बॉडीबिल्डिंग या प्रकारात सहभाग घेत आपल्या मेहनतीच्या आणि जिद्दीच्या बळावर आंतरराष्ट्रीय मंचावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. शरीरसौष्ठव क्षेत्रात यश मिळविण्यासाठी आवश्यक असलेली कठोर मेहनत, शिस्त, नियमित सराव आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षण यांच्या जोरावर पूजा धोटे यांनी हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. दुबई सारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे ही त्यांच्यासाठी अभिमानाची आणि सन्मानाची बाब ठरली.



आंतरराष्ट्रीय मंचावर भारताचा तिरंगा घेऊन उतरतानाचा क्षण पूजा धोटे यांच्यासाठी विशेष अभिमानाचा ठरला. त्यांच्या मते, ही उपलब्धी केवळ वैयक्तिक यश नसून त्यांच्या कुटुंबीयांनी, प्रशिक्षकांनी आणि संपूर्ण प्रवासात त्यांना प्रोत्साहन व सहकार्य करणाऱ्या सर्व व्यक्तींनी दाखविलेल्या विश्वासाचे आणि पाठिंब्याचे फलित आहे. पूजा धोटे यांनी आपल्या मेहनतीतून आणि समर्पणातून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय खेळाडूंची क्षमता अधोरेखित केली आहे. आगामी काळातही आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करून आणखी मोठे किताब जिंकण्याचे त्यांचे ध्येय आहे. त्यांच्या या यशस्वी वाटचालीमुळे नागपूरच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या पुढील वाटचालीकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

## बल्लारपूरात नागपूर विभाग पद्विधर मतदारसंघ निवडणूक आढावा बैठक




**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूरः-(धनंजय पांढरे )**

नागपूर विभाग पद्विधर मतदार संघाचे काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अभिजित वंजारी यांच्या निवडणूक प्रचारार्थ कबीर लॉन, बल्लारपूर येथे चंद्रपूर जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांच्या अध्यक्षतेखाली, खासदार श्रीमती प्रतिभा धानोरकर, आमदार अँड. अभिजित वंजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक पार पडली.

यावेळी माजी आमदार जैनुद्दिन जव्हेरी,युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शंतनू धोटे, शहर काँग्रेस अध्यक्ष अब्दुल करीम,न.प.उपाध्यक्ष देवेंद्र आर्य,तालुका काँग्रेस अध्यक्ष गोविंदा उपरे,सिनेट सदस्य दिपक धोपटे अनुसूचित जाती विभाग काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पवन भगत, भाष्कर माकोडे, नगरसेवक ईशमाईल ढाकवाला, माजी नगराध्यक्ष छाया मडावी, पवन मेश्राम, शिल्पा चुटे, वैष्णवी जुमडे,मोना धानोरकर, वैशाली हूमने , करुणा रेब्बावार, सुनीता जिवतोडे,प्रियंका थुलकर, अंकुबाई, मेघा भाले, आर. आर. यादव, नरेश मुंदडा डेविड कामपेल्ली कैलाश धानोरकर शाहिद शेख यासह बल्लारपूर काँग्रेसच्या विविध फ्रंटल आर्गनायझेशनचे तसेच विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पद्विधर मतदार उपस्थित होते.

थोडक्यात

## 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानाची कार्यशाळा

लोकसहभागातून निरोगी गावांच्या निर्मितीचा संकल्प



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

महाराष्ट्र शासनाच्या 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत ८ ऑक्टोबर रोजी येथील व्यंकटेश सभागृहात तालुकास्तरीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. ग्रामीण भागातील आरोग्य सेवा बळकट करणे आणि लोकसहभागातून निरोगी गावांची निर्मिती करणे, हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यशाळेची सुरुवात झाली. यावेळी नागतरोली, मेंढा आणि बेसूर ग्रामपंचायतींसह तालुक्यातील तीन आरोग्य उपकेंद्रांच्या कामांचे सादरीकरण करण्यात आले. अभियानाची उद्दिष्टे आणि गावपातळीवर करावयाच्या उपाययोजनांबाबत उपस्थित अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेला गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. काळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण राऊत, सहाय्यक गटविकास अधिकारी भोगे, डॉ. ताडी, गाडेवार, डॉ. कोरडे, जिल्हास्तरीय पर्यवेक्षक किशोर खुजे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा व अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या. कार्यशाळेचे संचालन तालुका आरोग्य सहाय्यक अशोक हेडाऊ यांनी केले. अभियानाची गावोगावी प्रभावी अंमलबजावणी करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

## धानला केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

धानला केंद्राची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद केंद्रप्रमुख राजू आंबीलकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली.या परिषदेला प्रमुख उपस्थिती म्हणून शालीका पवार, प्रणाली गोपाले, वासुदेव भुते (मुख्याध्यापक, पीएम श्री जि.प. उच्च प्राथमिक शाळा, दहेगाव), भास्कर पवार (मुख्याध्यापक, जि.प. प्राथमिक शाळा, धानला), गजानन बेले (मुख्याध्यापक, जि.प. उच्च प्राथमिक शाळा, पिंपरी) उपस्थित होते. केंद्रप्रमुख राजू आंबीलकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून शिक्षण परिषदेचे महत्त्व सर्व शिक्षकांना समजावून सांगितले.

मराठी विषयाचे तज्ञ मार्गदर्शक म्हणून रंजना बोरकर यांनी मार्गदर्शन केले.गणित विषयाचे तज्ञ मार्गदर्शक म्हणून सुधीर कांबळे यांनी मार्गदर्शन केले. या शिक्षण परिषदेच्या यशस्वीतेसाठी धानला केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व सहाय्यक शिक्षकांनी परिश्रम घेतले. धानला केंद्रातून बदली होऊन गेलेल्या जि.प. प्राथमिक शाळा, चारभा मुख्याध्यापिका वर्षा पाटील यांचा केंद्राच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भोवरी येथील शिक्षिका कु. पठाण यांनी कवितारूपी गीतामधून त्यांच्या कार्याचे वर्णन केले, तर शिक्षिका रंजना बोरकर यांनी दोन वर्षांच्या सहवासाचे सुंदर वर्णन केले. या परिषदेत धानला केंद्रातील सर्व शाळा निपुण कशा होतील याचे सूक्ष्म नियोजन सर्व मुख्याध्यापकांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका वनिता दंडारे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षिका रंजना बोरकर यांनी मानले.

## चाचेर येथील बाजार चौकातील मस्कऱ्या गणपती उत्सवाची परंपरा ४५ वर्षानंतरही कायम!

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

मौदा तालुक्यातील गावा- गावातील अनेक मस्कऱ्या गणेश उत्सव मंडळ ५,१०,१५ किंवा २० वषार्नंतर नामशेष होतात. मात्र याला



चाचेर येथील बाजार चौकातील श्री साईबाबा गणेश उत्सव मंडळ अपवाद आहे. येथील मस्कऱ्या गणपती उत्सवाची परंपरा मागील ४४ वर्षापासून सुरू असून यंदा ४५ व्या वर्षातही कायम आहे. म्हणून या मस्कऱ्या गणपतीला 'चाचेरचा राजा' म्हणूनही संबोधले जाते. दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्सवानिमित्त धार्मिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

गणेश उत्सवाच्या यशस्वीतेसाठी श्री साईबाबा गणेश उत्सव मंडळाचे पदाधिकारी अश्विन सोमनाथे, मोरेश्वर किरपाण, प्रभाकर दरवई, शुभम गडे,संदीप महादुले, आदित्य किरपाण, अमन जैतवार, मोहित बावणे, दादू बावणे, अशोक ढोंगे, सुरेश नगरे, हिमांशू महादुले, पराग किरपाण, रजत बिसणे, यश सोमनाथे, चेतन नाटकर, आकाश मोहने, आशिष नाटकर, राकेश किरपाण, हिमांशू महादुले, उमेश महादुले निखिल किरपाण सह समस्त ग्रामवासी सहकार्य करीत आहेत.

## गोवर्धन शिवराम बोदेले यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नॉर्थ अंबाझरी रोड, वर्मा ले आउट येथील रहिवासी श्री गोवर्धन शिवराम बोदेले (वय ८७ वर्षे) यांचे गुरुवारी ८ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी अंबाझरी घाट येथे अंत्यसंस्कार आले.

# पवित्र पोर्टल शिक्षक भरतीतील अनियमिततेची उच्चस्तरीय चौकशी करा!

आमदार विनोद अग्रवाल यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी, हिंदी माध्यमाच्या पात्र उमेदवारांना न्याय देण्याचे साकडे

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

पवित्र पोर्टलद्वारे राबविण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेतील कथित अनियमिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. गोंदिया जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षक भरती प्रक्रियेत माध्यम बदल, समांतर आरक्षणाची अंमलबजावणी तसेच पात्रता निकषांबाबत कथित त्रुटी असल्याच्या तक्रारींची दखल घेत गोंदियाचे आमदार विनोद शंकुतला संतोष अग्रवाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

**हिंदी माध्यमाच्या उमेदवारांवर अन्याय झाल्याचा आरोप**

गोंदिया जिल्हा परिषदेमार्फत पवित्र पोर्टलद्वारे राबविण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत हिंदी माध्यमाच्या रिक्त जागांवर इतर माध्यमांच्या उमेदवारांची निवड झाल्याचा, तसेच पात्रता निकष आणि आरक्षणविषयक नियमांच्या अंमलबजावणीत अनियमितता झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणातील कागदपत्रे, उमेदवारांची निवड प्रक्रिया आणि संबंधित नियमांची सखोल तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**पात्र उमेदवारांच्या निवड प्रक्रियेची पुनर्तपासणी करा!**

या प्रकरणासंदर्भात श्रीमती राजेश्वरी बसोना व अन्य सहकाऱ्यांनी निवेदन सादर केले आहे. त्यांच्या मागण्यांचा विचार करून संबंधित भरती प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करावी, पात्र हिंदी माध्यमाच्या उमेदवारांच्या प्रकरणांची पुनर्तपासणी करावी आणि अन्याय झालेल्या उमेदवारांना न्याय द्यावा, अशी मागणी आमदार अग्रवाल यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.



**आगामी TAIT परीक्षेत हिंदी भाषेतील प्रश्नांचा समावेश करण्याची मागणी**

महाराष्ट्रात मराठी आणि इंग्रजी भाषांसोबत उर्दू भाषेतही TAIT परीक्षा घेतली जात असल्याच्या पार्श्वभूमीवर आगामी ळअक्ळ परीक्षेत हिंदी भाषेतील प्रश्नांचाही समावेश करण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील हिंदी माध्यमाच्या शाळांची संख्या आणि हिंदी भाषिक उमेदवारांची गरज लक्षात घेता त्यांनाही समान संधी मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**सीमावर्ती जिल्ह्यात हिंदी शिक्षकांची गरज**

गोंदिया जिल्हा मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या सीमेलगत असल्याने येथे हिंदी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे हिंदी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षकांची आवश्यकता लक्षात घेऊन पात्र हिंदी माध्यमाच्या उमेदवारांना भरती प्रक्रियेत न्याय्य संधी देणे गरजेचे असल्याचे आमदार अग्रवाल यांनी अधोरेखित केले आहे.

**पारदर्शक चौकशीकडे उमेदवारांचे लक्ष**

शिक्षक भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखणे, पात्र उमेदवारांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि नियमांची योग्य अंमलबजावणी सुनिश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, पात्र उमेदवारांना न्याय द्यावा आणि आगामी ळअक्ळ परीक्षेत हिंदी भाषेतील प्रश्नांचा समावेश करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

# रविवार ११ ऑक्टोबर रोजी मनपाची सायकल रॅली

सेवा संकल्प अभियानांतर्गत भव्य आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्र व राज्य शासनाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या वतीने भव्य सायकल रॅलीचे आयोजन रविवार, ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता सिव्हील लाईन्स स्थित मनपा मुख्यालय येथून करण्यात आले आहे. नागपुरातील सायकलपटू व सर्व सायकल प्रेमी चमू मोठ्या उत्साहात सहभागी होणार आहेत.

विशेष म्हणजे, सायकल रॅली मनपा मुख्यालय, सिव्हिल लाईन्स येथून आकाशवाणी चौक, जी.पी.ओ. चौक, सी.पी. क्लब, हनुमान मंदिर, तेलंखेडी आणि व्ही.सी.ए. चौक या मार्गाने प्रवास करत मनपा मुख्यालयासमोरील हिरवळीवर रॅलीचा समारोप होणार आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या सेवा



संकल्प अभियानाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि या उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करणे, हा या सायकल रॅलीच्या आयोजनामागील उद्देश आहे. या सायकल रॅलीच्या माध्यमातून सेवा संकल्प अभियानाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी नागपूर शहरातील नागरिक, सायकलप्रेमी, युवक-युवती आणि विविध संस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात येत आहे.

## आ. आशिषराव देशमुख यांच्या उपस्थितीत पंचायत समिती सावनेर येथे टंचाई निवारण व आढावा बैठक संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर तालुक्यातील संभाव्य पाणीटंचाईवर प्रभावी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आमदार आशिषराव देशमुख (सावनेर-कळमेश्वर विधानसभा क्षेत्र) यांच्या उपस्थितीत पंचायत समिती सावनेर येथे टंचाई निवारण व आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत तालुक्यातील ७६ ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठ्याचा आढावा घेऊन पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक उपाययोजनांचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. सावनेर तालुक्यातील सर्व गावांमधील पाण्याचे उपलब्ध स्त्रोत पुनर्जीवित करून त्यांचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला. तसेच नाला खोलीकरण, बंधाऱ्यांना गेट बसविणे, तलावांमधील पाण्याची गळती रोखणे आदी उपाययोजनांबाबत आमदार देशमुख यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश दिले. पाणीटंचाईच्या काळात उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करून नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याचे आवाहनही करण्यात आले. यावेळी उपस्थित सरपंचांना गावातील सार्वजनिक नळांद्वारे खाजगी बांधकामांसाठी पाणीपुरवठा करण्यात येऊ नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. सार्वजनिक पाण्याचा वापर प्राधान्याने नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या गरजांसाठी करण्यात यावा, यावर विशेष भर देण्यात आला.

याप्रसंगी महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार डॉ. राजीव पोतदार यांनीही मार्गदर्शन केले. महाराष्ट्रासमोरील दुष्काळी संकटाचा सामना करण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायती यांनी एकजुटीने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. उपलब्ध जलस्त्रोतांचे संवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर आणि स्थानिक पातळीवर सूक्ष्म नियोजन यांद्वारे टंचाईच्या परिस्थितीवर मात करता येईल, असे त्यांनी नमूद केले. या बैठकीस उपविभागीय अधिकारी कल्याणकुमार डहाट, तहसीलदार अक्षय पोयाम, गटविकास अधिकारी मनोजकुमार हिरुडकर, नागपूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष मनोहर कुंभारे, पाणीपुरवठा अभियंता गाठीबांधे, सावनेर तालुक्यातील सर्व सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत करण्यात आलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## शेतकऱ्यांच्या वीज तक्रारींसाठी महावितरणची '२४ बाय ७' हेल्पलाईन, मोबाईल ॲपवरूनही नादुरुस्त रोहित्राची तक्रार शक्य

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या वीजविषयक तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी महावितरणने विशेष व्यवस्था केली आहे. नागपूर जिल्ह्यात रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बिघाडासह इतर तातडीच्या वीजविषयक तक्रारींची नोंद घेऊन त्यावर आवश्यक कार्यवाही करण्यासाठी ७८७५७६१०० हा हेल्पलाईन क्रमांक २४ तास, सातही दिवस उपलब्ध करण्यात आले आहेत. यासोबतच नादुरुस्त किंवा बंद पडलेल्या रोहित्राची माहिती 'महावितरण मोबाईल ॲप' आणि महावितरण संकेतस्थळाद्वारे एका क्लिकवर नोंदविण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

शेतीसाठी सुरळीत वीजपुरवठा महत्त्वाचा असल्याने रोहित्र बिघाडामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास त्याची तातडीने दखल घेणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन महावितरणने तक्रार निवारणासाठी समन्वय यंत्रणा कार्यान्वित केली आहे. हेल्पलाईनवर प्राप्त होणाऱ्या तक्रारींची नोंद घेऊन नागपूर जिल्ह्यातील संबंधित महावितरण अधिकारी व कर्मचाऱ्यांशी समन्वय साधण्यात येणार आहे, जेणेकरून बिघाड दूर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करता येईल.

**मोबाईल ॲपवरून एका क्लिकमध्ये रोहित्र बिघाडाची नोंदः**

नागपुर जिल्ह्यातील शेतकरी तसेच सर्वसामान्य वीजग्राहकांना नादुरुस्त किंवा बंद पडलेल्या रोहित्राची माहिती थेट 'महावितरण मोबाईल ॲप'द्वारे देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महावितरणचे नागपूर जिल्ह्यात तब्बल १ लाख ४५ हजार १५६ कृषी ग्राहक असून ६ हार ५०० पेक्षा अधिक सिंगल फेज वितरण रोहित्रे आहेत. यापैकी बहुतांश रोहीत्रांचे जिओ-लोकेशनसह मॅपिंग पूर्ण झाले आहे. त्यामुळे संबंधित रोहित्राचे अचूक ठिकाण निश्चित करून त्याच्या बिघाडाची माहिती देणे अधिक सुलभ झाले आहे.

या सुविधेचा वापर करण्यासाठी ग्राहक क्रमांकाद्वारे लॉगिन करता येते किंवा गेस्ट म्हणूनही तक्रार नोंदविता येते. तक्रार नोंदविताना संबंधित रोहित्राच्या ठिकाणाजवळ असणे, मोबाईलचे लोकेशन सुरू ठेवणे आणि ॲपला लोकेशनची परवानगी देणे आवश्यक आहे. ॲपमधील 'नादुरुस्त रोहित्राची माहिती नोंदवा' हा पर्याय निवडून आवश्यक माहिती भरावी, संबंधित रोहित्राचा फोटो काढावा आणि नोंदणी पूर्ण करावी. ही माहिती संबंधित अभियंता व जनमित्रांपर्यंत पोहोचल्याने रोहित्राची तपासणी करून आवश्यक दुरुस्ती किंवा बदल करण्यासाठी कार्यवाही करता येते. तक्रारीवरील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर तक्रारदाराला व्हॉट्सॲपद्वारे माहिती देण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

**वेबसाईट आणि टोल फ्री क्रमांकावरूनही ही सुविधाः**

मोबाईल ॲपव्यतिरिक्त महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर, संबंधित महावितरण कार्यालयात किंवा ग्राहक सुविधा केंद्रातही तक्रार नोंदविता येते. तसेच महावितरणच्या २४ तास सुरू असलेल्या कॉल सेंटरच्या १८००२१२३४३५, १८००२३३३४३५, १९१२ आणि १९१२० या क्रमांकांवर संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध आहे. संकेतस्थळ तसेच मोबाईल ॲपवरील 'ऊर्जा चॅटबॉट'द्वारेही मराठी आणि इंग्रजी भाषेत तक्रारी नोंदविता येतात.

# सन्मित्र सैनिक विद्यालयात १२ वर्षीय विद्यार्थ्याचा संशयास्पद मृत्यू, गावात पोहोचण्यापूर्वीच पित्याला आला फोन

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे**

हसतखेळत मुलाला शाळेत सोडून पिता आपल्या गावाकडे परतत होता. मात्र, गावात पोहोचण्यापूर्वीच शिक्षकाचा फोन आला आणि अवघ्या १२ वर्षांच्या मुलाच्या मृत्यूची बातमी कानावर पडली. काही तासांपूर्वी डोळ्यांसमोर असलेल्या लेकराच्या मृत्यूची बातमी ऐकताच पित्याच्या पायाखालची जमीनच सरकली. विसापूर येथील सन्मित्र सैनिक विद्यालयात इयत्ता सहावीत शिकणाऱ्या जीवन विलास झरेकर या विद्यार्थ्याचा गुरुवार ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी संशयास्पद परिस्थितीत मृत्यू



झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे, जीवनच्या शरीरावर फुरळ आल्यामुळे त्याला रुग्णालयात नेण्यात आले होते.

तसेच विद्यालयातील इतरही अनेक विद्यार्थ्यांच्या अंगावर फुरळ आल्याची माहिती समोर येत असल्याने या घटनेबाबत विविध प्रश्न उपस्थित होत आहेत. जीवन झरेकर हा राजुरा तालुक्यातील खांबाळा येथील रहिवासी होता. तो विसापूर येथील भिवकुंड परिसरातील सन्मित्र सैनिक विद्यालयात इयत्ता सहावीत शिक्षण घेत होता. गुरुवारी त्याच्या शरीरावर फुरळ आल्यामुळे वडिलांनी त्याला चंद्रपूर येथील एका खासगी रुग्णालयात नेले होते. मात्र, रुग्णालयात त्याला कोणतीही औषधे किंवा इंजेक्शन देण्यात आले नसल्याचे वडिलांनी सांगितले.

त्यानंतर वडिलांनी जीवनला सायंकाळी शाळेत सोडले आणि ते आपल्या गावाकडे परतण्यासाठी निघाले. मात्र, ते गावात पोहोचण्यापूर्वीच एका शिक्षकाचा त्यांना फोन आला. या फोनवरून त्यांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची माहिती देण्यात आली. काही वेळापूर्वीच मुलाला शाळेत सोडून आलेल्या पित्याला अचानक त्याच्या मृत्यूची बातमी मिळाल्याने झरेकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

प्राथमिक माहितीनुसार, जीवन विद्यालयाच्या परिसरात गंभीर अवस्थेत आढळून आला होता. त्याला तातडीने चंद्रपूर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. अवघ्या १२ वर्षांच्या विद्यार्थ्याचा अशा परिस्थितीत मृत्यू झाल्याने विद्यालय परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, प्राप्त माहितीनुसार, विद्यालयातील इतर अनेक विद्यार्थ्यांच्या अंगावरही फुरळ असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगावर फुरळ येण्यामागील कारण काय, त्याचा जीवनच्या प्रकृतीशी काही संबंध होता का आणि विद्यालयातील परिस्थिती नेमकी काय होती, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. मात्र, या माहितीची अधिकृत पुष्टी झालेली नाही. फुरळ येणे आणि जीवनचा मृत्यू यांच्यात काही संबंध आहे का, हेही अद्याप स्पष्ट झालेले नाही. जीवनचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, शाळेत सोडल्यानंतर त्याच्यासोबत काय घडले आणि त्याची प्रकृती अचानक कशी खालावली, याबाबत संभ्रम कायम आहे. प्राथमिक माहितीनुसार आत्महत्येचा संशय व्यक्त केला जात असला, तरी मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

एका अल्पवयीन विद्यार्थ्याच्या संशयास्पद मृत्यूमुळे विद्यालय परिसरात शोककळा पसरली आहे. या घटनेतील सर्व बाबींची सखोल चौकशी करून सत्य समोर आणण्याची गरज व्यक्त होत आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून, तपासाअंतीच जीवनच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

# अमूल्य जीवनातील यशाचे मोजमाप आपली मानसिक शांती दर्शवते

**जागतिक मानसिक आरोग्य दिन**



**डॉ. प्रितम भि. गेडाम**
**नागपूर**

आजच्या युगात स्वार्थ, लोभ, द्वेष, चारित्र्यहीनता, भ्रष्टाचार, व्यसनाधीनता, भेसळखोरी, प्रदूषण, भेदभाव आणि माणसाच्या अमर्यादित इच्छा पूर्ण करण्यासाठी सुरू असलेला कधीही न संपणारा संघर्ष जीवनातील सुकून हिरावून घेत आहे. प्रत्येकजण आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी मेंढरांच्या कळपाप्रमाणे धावत आहे. कोणाकडे रोजगार नाही, कोणाकडे प्रेम नाही, कुटुंब नाही, चारित्र्यवान जोडीदार नाही, नात्यात विश्वास नाही, निरोगी शरीर नाही, संस्कारशील मुले नाहीत, सहकार्य करणारे कुटुंब, नातेवाईक आणि मित्र नाहीत, वेळ नाही, नाव आणि प्रसिद्धी नाही, कोणाचा आधार नाही, तर कोणाकडे संपत्ती नाही. जगात कोणताही मनुष्य जीवनातील सर्व सुख, शांतता आणि सुख-सुविधांनी परिपूर्ण असू शकत नाही.

प्रत्येकाच्या जीवनात समस्या असतात; मात्र त्यांच्यामुळे संपूर्ण आयुष्य त्रस्त राहून आणि सतत भीतीत जगणे योग्य नाही. आपल्याकडे जे उपलब्ध आहे, त्याचे समाधान मानण्याऐवजी मनुष्य असमाधानी बनून स्वतःचे जीवनच दुःखमय करत आहे. मनुष्य आपल्या जीवनातील आनंदाची व्याख्याच बदलत आहे. तो इतरांच्या दुःखात आनंद आणि इतरांच्या आनंदात ईर्ष्येने भरून जातो. स्वतःच्या स्वाथार्साठी निसर्गाचे शोषण करतो आणि नंतर स्वतःच अशुद्ध हवा-पाणी, निकृष्ट अन्न आणि आजारांच्या समस्यांमुळे त्रस्त होतो. भौतिक सुख-सुविधांच्या मागे धावताना आज पैसा हाच देव बनला आहे, हे सिद्ध करण्यासाठी लोक जणू कटिबद्ध झाले आहेत.

आज मानसिक आरोग्याशी संबंधित समस्या अत्यंत वेगाने वाढल्या आहेत; मात्र लोक या आरोग्य समस्यांशी तडजोड करून घुसमटत जीवन जगत आहेत. तणावामुळे सिझोफ्रेनिया मनोविकार, द्विध्रुवी आणि मनोदशा विकार, प्रमुख नैराश्य विकार, पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस विकार, तीव्र चिंता, खाण्याचे विकार, मादक पदार्थांच्या सेवनाशी संबंधित विकार, टाइप-२ मधुमेह आणि चयापचय सिंड्रोम, हृदयरोग, स्थूलता, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीस, मज्जासंस्थेशी संबंधित आणि स्नायू-हाडांच्या समस्या, दीर्घकालीन वेदना सिंड्रोम, मायग्रेन, ऑस्टिओपोरोसिस आणि हालचालींशी संबंधित विकार, जठरांत्रीय तसेच प्रतिकारशक्तीशी संबंधित विकार यांसारखे अनेक गंभीर विकार उद्भवू शकतात. मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी जगभरात दरवर्षी १० ऑक्टोबर रोजी 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' साजरा केला जातो. वर्ष २०२६ मध्ये या दिनाची थीम 'वैयक्तिक अनुभव ऐकणेः खरे आवाज, खरा बदल' अशी आहे.

मनुष्याने प्राण्यांप्रमाणे साधे जीवन जगायला हवे; मात्र खोट्या देखाव्याच्या आणि आधुनिकतेच्या स्पर्धेत मनुष्य आपले मानसिक आरोग्य उद्ध्वस्त करत आहे. अनेक वेळा जीवनात इतरांच्या आनंदासाठी चांगले लोक स्वतःच्या आनंदाचाही त्याग करतात. हे असेच सुरू राहते आणि इतरांच्या आनंदाची काळजी घेताना आपण आपली मानसिक शांती गमावून बसतो. जीवनात सर्वात जास्त आवश्यक असते ते म्हणजे मानसिक शांतता, ज्यामुळे मनुष्य शांतपणे श्वास घेऊ शकतो. मानसिक सुकून हा आपल्या मनातील आनंदाशी जोडलेला असतो. तो आपण विकत घेऊ शकत नाही; तर आपल्या सत्कर्मांनी आणि चांगल्या आचरणातूनच तो प्राप्त करू शकतो.

काही काळापूर्वी मी एक बातमी वाचली होती की, अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅलीमधील एका भारतीय उद्योजकाने आपली १०० कोटी रुपयांची संपत्ती आणि आलिशान जीवनशैलीचा त्याग करून भारतातील एका छोट्याशा गावात येऊन स्थायिक झाला. त्याने भौतिक सुख-सुविधांऐवजी मानसिक सुकून, निसर्गाच्या सान्निध्यातील जीवन आणि आत्मिक संतुलनाला प्राधान्य दिले. हे केवळ एक उदाहरण नाही; जगात अशी अनेक उदाहरणे पाहायला मिळतील. जीवनात मानसिक शांती नसेल, तर आपल्याकडे सर्व काही असूनही आपण गर्दीत स्वतःला एकटे समजतो. आपले जीवन सर्वांत अनमोल आहे आणि मानसिक शांती आपल्या जीवनातील खऱ्या यशाचे दर्शन घडवते की आपण किती सुकूनाने जगत आहोत. पैशाने केवळ क्षणिक सुखसोयी विकत घेता येतात.

आपल्या देशात कामगार आणि शेतकरी वर्गात आत्महत्येच्या घटना अधिक प्रमाणात पाहायला मिळतात. लहान व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी, युवक आणि सरकारी कर्मचारी यांच्यासह विविध स्तरांतील व्यक्तींमध्येही आत्महत्येच्या घटना वाढताना दिसतात. अशा घटनांकडे केवळ एका व्यक्तीच्या निर्णयाच्या रूपात न पाहता, त्यामागील मानसिक ताण, भावनिक संघर्ष, सामाजिक परिस्थिती आणि जीवनातील अडचणी समजून घेणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीची तणाव सहन करण्याची आणि संकटांना सामोरे जाण्याची क्षमता वेगवेगळी असते. त्यामुळे अडचणीच्या काळात व्यक्तीला दोष देण्याऐवजी तिचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, भावनांची कदर करणे आणि आवश्यक तेव्हा आधार व मदत मिळवून देणे अधिक महत्त्वाचे आहे.

नेते चांगले असोत किंवा वाईट, सार्वजनिक जीवनात कार्यरत असलेल्या नेत्यांना विविध प्रकारच्या राजकीय, सामाजिक आणि वैयक्तिक दबावांना सामोरे जावे लागते. निवडणुकीतील पराभव, आरोप, घोटाळ्यांबाबत तपास यंत्रणांची कारवाई, माध्यमांमधील टीका, न्यायालयीन प्रकरणे, राजकीय मतभेद, धमक्या तसेच आर्थिक किंवा सामाजिक नुकसान यांसारख्या परिस्थिती त्यांच्या समोर येऊ शकतात. अशा आव्हानात्मक परिस्थितीतही नेते आपली सार्वजनिक जबाबदारी पार पाडताना संयम आणि आत्मविश्वास टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. निवडणुकीच्या काळात अनेक नेते वय वाढलेले असतानाही शेकडो-हजारो किलोमीटरचा प्रवास करतात. पाऊस, ऊन, थंडी, वादळ किंवा खराब हवामान यांसारख्या प्रतिकूल परिस्थितीतही ते कमी झोप आणि विश्रांतीच्या मर्यादित वेळेत शारीरिक व मानसिक दबावाचा सामना करत काम करतात.

सभा आणि रॅलींमध्ये त्यांचा उत्साह व ऊर्जा दिसून येते. त्यामुळे नेत्यांच्या सार्वजनिक जीवनातून कठीण परिस्थितीत संयम राखणे, आत्मविश्वास टिकवून ठेवणे आणि तणावाचे सकारात्मक पद्धतीने व्यवस्थापन करणे यांसारखे उपयुक्त गुण प्रत्येकाला शिकता येतात. त्याचबरोबर, मानसिक तणावाचा सामना करताना प्रत्येक व्यक्तीने आपल्या परिस्थितीनुसार योग्य आधार, संवाद आणि आवश्यक मदत घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

प्रत्येकजण आपल्या फायद्यासाठी इतरांच्या मनाशी खेळत असतो. इतरांच्या आनंदासाठी आपल्या आनंदाचा गळा घोटू नका. जी व्यक्ती आपल्या वाईट काळात आपली साथ देते, आपल्या भावनांची कदर करते आणि आपली काळजी घेते, आपणही तिची कदर केली पाहिजे. इतर लोक आपल्या स्वार्थानुसार खेळ खेळतात; त्यांना आपल्या जीवनाशी खेळण्याची संधी देऊ नका. कोणाचीही कठपुतळी बनू नका. अशा लोकांपासून सावध राहा आणि दूर राहा. आपल्या आत्मिक आनंदाचा अर्थ समजून घ्या. भौतिक सुख-सुविधाच सर्व काही नाहीत. निश्चिंतपणे जगायला शिका.

तणावामुळे कोणताही फायदा होत नाही, उलट केवळ नुकसानच होते. जीवनातील प्रत्येक समस्येकडे एक संधी म्हणून पाहून हसत-हसत तिचा सामना करा. संघर्ष हा जीवनाचा एक भाग आहे; घाबरायचे नाही, तर ठामपणे उभे राहायचे आहे. जगातील महान व्यक्तींनीही आपल्या जीवनाला संघर्षांनी घडवले आहे; त्यानंतरच त्यांनी नाव आणि प्रसिद्धी मिळवली आहे.

जीवनात पुढे जायचे असेल तर आपले ध्येय निश्चित करा आणि सतत अधिक चांगले होण्याचा प्रयत्न करा. दररोज काहीतरी नवीन शिका. जीवनातील छोट्या-छोट्या क्षणांतही आनंद वाटायला शिका. आयुष्याबद्दल तक्रारी न करता त्यावर उपाय शोधायला शिका. अतिविचार करणे टाळा आणि लोकांकडून अधिक अपेक्षा ठेवू नका. कधीही हार मानून बसू नका. काळ बदलत असतो; आपलाही काळ बदलेल. आपण ज्या वातावरणात राहतो, त्याचा आपल्या शरीरावर आणि मनावर तसाच परिणाम होतो. त्यामुळे वाईट विचारांच्या लोकांपासून आणि वाईट सवयींपासून नेहमी दूर राहा. घर-परिवाराची जबाबदारी सांभाळताना स्वतःच्या आनंदाचीही काळजी घ्या. निरोगी छंद, व्यायाम, प्राणीप्रेम, समाजसेवा, परोपकार आणि निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याची सवय वाढवा. यामुळे जीवनात शांती मिळते.

पौष्टिक आहार घ्या, संगीत ऐका, प्रवास करा, सामूहिक श्रमदानाचा भाग बना आणि आपल्या गुणांना ओळखा. ज्या विषयात आवड आहे, त्यावर काम करा. मात्र, आपल्या कामामुळे कोणालाही त्रास होऊ नये. हे अनमोल जीवन एकदाच मिळते. जीवन जगण्यासाठी आहे, केवळ दिवस काढण्यासाठी नाही. व्यस्ततेचे कारण देणे सोडा आणि स्वतःच्या आनंदासाठी वेळ काढायला शिका. आपली चांगली कर्मे करत राहा आणि पुढे जात राहा. सर्वांत जास्त स्वतःच्या मानसिक शांततेला प्राधान्य द्या, आनंदी राहा आणि तणावमुक्त जीवन जगा.

– (महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक)–
०८२३७४१७०४१

## जागतिक मानसिक आरोग्य दिन विशेष

# आधी ऐकूया, मग बदल घडेल!

**कुंदा काटेखाये बिडकर**
**समाजसेवा अधीक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर**

२००७ पासून शासकीय आरोग्य सेवेत काम करताना, आणि आता प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथील महिला विभागात, मी एक गोष्ट पुन्हा पुन्हा अनुभवली आहेः मानसिक आजाराच्या उपचारातला पहिला टप्पा केवळ औषध नसतो, ऐकून घेणेही असतो. कधी कधी एका व्यक्तीचा पत्ता शोधणे म्हणजे केवळ एक पत्ता शोधणे नसते; ते तिचे कुटुंब, तिची ओळख आणि तिचे हरवलेले आयुष्य पुन्हा शोधणे असते. आजवर दोनशेहून अधिक अनोळखी महिला रुग्णांचे त्यांच्या कुटुंबाशी पुनर्मिलन घडवून आणण्याचा अनुभव मला मिळाला आहे. या प्रत्येक प्रवासात एक गोष्ट समान होतीः कुणीतरी वेळ देऊन त्यांचे बोलणे ऐकले. १० ऑक्टोबरच्या जागतिक मानसिक आरोग्य दिनाची यंदाची संकल्पना नेमकी हीच गोष्ट सांगते.

### यंदाचा संदेशः ज्यांनी अनुभवले, त्यांचे ऐका

यंदाची संकल्पना आहे, “Lived Experiences Heard: Real Voices, Real Change”, जी जागतिक मानसिक आरोग्य महासंघाने जाहीर केली आहे. तिचा अर्थ सोपा आहेः मानसिक आजाराचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या व्यक्तींचे आवाज ऐका, त्यातून खरा बदल घडेल. मानसिक आरोग्य सेवा कशा असाव्यात, हे केवळ तज्ज्ञांनी ठरवू नये. रुग्ण, आजारातून सावरलेल्या व्यक्ती, कुटुंबीय आणि काळजीवाहक यांच्या अनुभवांनाही त्यात स्थान मिळायला हवे.

प्रश्न साधा आहे, पण महत्त्वाचाः मानसिक आजारातून गेलेल्या व्यक्तीला आपण खरेच ऐकतो का? तिला काय वाटते? उपचार घेताना कोणत्या अडचणी येतात? कुटुंबाकडून तिच्या काय अपेक्षा आहेत? समाजातले कोणते शब्द आणि वर्तन तिला दुखावते? रुग्णालयातून बाहेर आल्यानंतर तिला कोणत्या मदतीची गरज असते? या प्रश्नांची उत्तरे ज्यांनी हा प्रवास केला आहे, त्यांच्याकडेच आहेत. महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागानेही १० ते १६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'मन जागृती' राष्ट्रीय मानसिक आरोग्य जनजागृती अभियान राबविण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हा, तालुका, शाळा, महाविद्यालय, कार्यस्थळ आणि समुदाय पातळीवर विविध उपक्रम घेण्यावर त्यात भर आहे.

खरे अनुभव ऐकले, तर सेवा बदलतील; सेवा बदलल्या, तर जीवन बदलतील.

### मानसिक आरोग्य म्हणजे नेमके काय?

मानसिक आरोग्य म्हणजे केवळ मानसिक आजार नसणे नव्हे. स्वतःच्या भावना समजून घेता येणे, ताणतणावाचा सामना करता येणे, नातेसंबंध टिकवता येणे, रोजच्या जबाबदाऱ्या पार पाडता येणे आणि समाजात सन्मानाने जगता येणे, हे सगळे त्याचे भाग आहेत. मधुमेह, रक्तदाब किंवा हृदयविकार जसे शरीराचे आजार आहेत, तसेच नैराश्य, चिंता विकार, द्विध्रुवीय विकार, स्किझोफ्रेनिया आणि व्यसनाधीनता हे आरोग्याचेच प्रश्न आहेत. त्यामागे एकच कारण नसते. आनुवंशिकता आणि जैविक घटक, दीर्घकाळचा ताण, बालपणातले कटू अनुभव, कौटुंबिक संघर्ष किंवा हिंसा, गरिबी आणि बेरोजगारी, एकटेपणा, प्रिय व्यक्तीचा मृत्यू किंवा आयुष्यातले मोठे बदल, तसेच दारू, तंबाखू आणि अमली पदार्थांचे व्यसन, अशा अनेक गोष्टी एकत्र येऊन परिणाम करतात. म्हणूनच मानसिक आजार हा शाप नाही, पाप नाही, भूतबाधा नाही आणि कमकुवत इच्छाशक्तीचा परिणामही नाही. योग्य वेळी निदान, उपचार, कुटुंबाचा आधार आणि पुनर्वसन मिळाले, तर अनेक व्यक्ती पुन्हा सक्षम आणि सन्मानपूर्ण जीवन जगू शकतात. 'तुझ्यामुळेच हे झाले' असे म्हणण्याऐवजी 'तुला मदतीची गरज आहे, आपण ती मिळवूया' असे म्हणणे, हीच मदतीची पहिली पायरी आहे.

### आजारापेक्षा मोठा अडथळाः कलंक

अनेकदा मानसिक आजारापेक्षा त्याच्याभोवतीचा सामाजिक कलंकच व्यक्तीच्या आयुष्यावर जास्त परिणाम करतो. वेडा, पागल, कमजोर मनाचा, करणी झाली आहे, भूतबाधा आहे, असे शब्द ऐकून व्यक्ती आणि तिचे कुटुंब उपचार घ्यायला घाबरतात. लग्न होणार नाही, नोकरी जाईल, लोक काय म्हणतील, ही भीती उपचाराच्या आड येते.

त्यामुळे अनेक कुटुंबे आधुनिक उपचारांकडे येण्याआधी दीर्घकाळ अंधश्रद्धेच्या मार्गावर फिरतात. त्यात वेळ जातो, पैसा जातो, आणि कधी कधी आजारी व्यक्तीला अमानुष वागणूकही सहन करावी लागते. श्रद्धा ही वैयक्तिक बाब आहे; पण मानसिक आजारावर वैज्ञानिक उपचारच आवश्यक आहेत.

मानसिक आजार असलेली प्रत्येक व्यक्ती हिंसक असते हा समजही चुकीचा आहे. उलट, अशा अनेक व्यक्तींना समाजाकडून दुर्लक्ष, अपमान, भेदभाव आणि हिंसा सहन करावी लागते. म्हणून आपला पहिला संदेश असावाः कलंक नको, समजून घेऊया; दूर लोटू नका, साथ देऊया.

### उपचार आणि पुनर्वसनः प्रवास रुग्णालयात संपत नाही

मानसिक आजारात औषधोपचार, मानसोपचार, समुपदेशन, कौटुंबिक समुपदेशन आणि सामाजिक पुनर्वसन, यांचा एकत्र वापर केला जातो. पण थोडे बरे वाटले की औषधे स्वतःहून बंद केली जातात. काही कुटुंबांना औषधांची सवय लागेल अशी भीती वाटते, तर काहींचे उपचार दुष्परिणामांमुळे खंडित होतात. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे बंद किंवा कमी करू नयेत. दुष्परिणाम जाणवले, तर औषध सोडून देण्याऐवजी डॉक्टरांशी बोलावे. उपचारात खंड पडला, तर लक्षणे पुन्हा वाढू शकतात आणि रुग्णाला वारंवार रुग्णालयात दाखल करावे लागू शकते. म्हणूनच नियमित उपचार, फॉलो-अप आणि कुटुंबाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

रुग्णालयातून डिस्चार्ज मिळणे हे अंतिम उद्दिष्ट नाही, तो एक टप्पा आहे. खरे उद्दिष्ट आहे, व्यक्तीला कुटुंबात, समाजात आणि शक्य असेल तर रोजगारात पुन्हा सामावून घेणे. पुनर्वसनात वैद्यकीय उपचार आणि फॉलो-अप, कुटुंबाचे समुपदेशन, कौशल्य विकास आणि रोजगार, शिक्षणाची पुनर्स्थापना, शासकीय योजनांचा लाभ, तसेच सुरक्षित निवारा आणि सामाजिक आधार, या सगळ्याचा समावेश होतो. घरी परतल्यावर स्वीकार मिळाला नाही, तर एकटेपणा, उपचारातला खंड आणि आजाराची पुनरावृत्ती हे चक्र पुन्हा सुरू होते. म्हणून रुग्णालयातून घरी एवढ्यावर हा प्रवास थांबता कामा नये. तो घराबाहेर, समाजात, सन्मानाने येथपर्यंत पोहोचला पाहिजे.

### ऐकण्याने मला काय शिकवले

या संकल्पनेबद्दल माझा स्वतःचा अनुभव सांगायचा तर, आजवर मला खूप काही सकारात्मक आणि नकारात्मक ऐकायला मिळाले, काही असे, ज्याची आपण कल्पनाही करू शकत नाही. त्यामुळेच रुग्णाचे कौटुंबिक पुनर्मिलन किंवा पुनर्वसन करताना मला योग्य दिशा सापडली. मी जर काही न ऐकता, खोलवर संवाद न साधता, सामाजिक हस्तक्षेपाचा विचार न करता पुनर्वसन केले असते, तर ते रुग्ण आणि त्यांची कुटुंबे पुन्हा आजाराच्या विळख्यात अडकली असती, यात मला शंका नाही. ऐकण्याच्या या सवयीमुळे समाजाचे अनेक सकारात्मक पैलूही मला दिसले. आणि हे ऐकणे केवळ रुग्णापुरते नसते. त्याच्या कुटुंबातील सदस्यांशी बोलणे आणि त्यांचे ऐकून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

समाजकार्यकर्ता हा उपचार आणि समाज यांच्यातला दुवा असतो. रुग्ण आणि कुटुंबाचे समुपदेशन, सामाजिक परिस्थितीचे मूल्यांकन, कुटुंबाचा शोध, शासकीय योजना आणि कायदेशीर मदतीशी जोडणी, स्वयंसेवी संस्थांशी समन्वय, हे सगळे या भूमिकेत येते. अनोळखी किंवा कुटुंबापासून दुरावलेल्या व्यक्तीला तिच्या कुटुंबाशी पुन्हा जोडणे ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नाही; ती त्या व्यक्तीच्या मानवी हक्कांची, सन्मानाची आणि सामाजिक अस्तित्वाची पुनर्स्थापना आहे. आणि हे काम कधीच एकट्याचे नसते. मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात टीमवर्क अत्यंत महत्त्वाचे आहे, आणि ते केवळ रुग्णालयापुरते मर्यादित असून चालणार नाही. रुग्ण, त्याचे कुटुंबीय, समाज, पोलीस यंत्रणा, शासकीय आणि निमशासकीय संस्था, या सर्वांनी राज्यात, देशात आणि गरज पडल्यास आंतरराज्य किंवा आंतरदेशीय पातळीवरही एकत्र काम केले, तरच दिवसागणिक वाढणाऱ्या या समस्येवर आपण नियंत्रण मिळवू शकू.

### कुटुंबाचा आधार, समाजाची जबाबदारी

उपचारातला सर्वात मजबूत आधार म्हणजे कुटुंब. लक्षणे लवकर ओळखणे, व्यक्तीला दोष न देणे, उपचारासाठी प्रोत्साहन देणे, औषधे आणि फॉलो-अपमध्ये साथ देणे, सन्मानाने संवाद साधणे, घरात शांत आणि सुरक्षित वातावरण ठेवणे आणि व्यक्तीच्या क्षमतेनुसार तिला जबाबदाऱ्या व संधी देणे, हे सारे कुटुंबाच्या हातात आहे. एक गोष्ट मात्र कुटुंबीय अनेकदा विसरतातः काळजी घेणाऱ्यांनी स्वतःच्या मानसिक आरोग्याचीही काळजी घ्यायला हवी.

समाजानेही आपल्याला काय? या भूमिकेतून आपण काय करू शकतो? येथपर्यंत यायला हवे. मानसिक आरोग्य ही केवळ डॉक्टर किंवा रुग्णालयाची जबाबदारी नाही.

-शाळा मुलांशी या विषयावर मोकळेपणाने बोलू शकतात.

-महाविद्यालये समुपदेशन आणि जनजागृती कार्यक्रम घेऊ शकतात.

-कार्यस्थळे तणावमुक्त आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करू शकतात.

-ग्रामपंचायती आणि स्थानिक संस्था सेवा लोकांपर्यंत पोहोचवू शकतात.

-पोलीस आणि प्रशासन संकटातील व्यक्तींना योग्य आरोग्यसेवेशी जोडू शकतात.

-स्वयंसेवी संस्था पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्स्थापनेत हातभार लावू शकतात.

-माध्यमे संवेदनशील आणि जबाबदार भाषा वापरू शकतात.

आणि आपल्यापैकी प्रत्येक जण एखाद्या माणसाचे शांतपणे ऐकू शकतो.

### मदत कधी आणि कुठे मिळेल

खालील बदल सातत्याने जाणवत असतील, तर मानसिक आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घ्यावाः सतत उदास किंवा निराश वाटणे, झोप आणि भुकेत मोठा बदल, काम, शिक्षण किंवा रोजच्या गोष्टींतला रस कमी होणे, लोकांपासून दूर राहणे, अतिचिंता, भीती किंवा चिडचिड, असामान्य संशय किंवा वर्तनातले मोठे बदल, नसलेले आवाज ऐकू येणे, अति उत्साह आणि झोपेची गरज कमी वाटणे, तसेच दारू किंवा अमली पदार्थांचा वाढता वापर. जगण्यात अर्थ नाही किंवा स्वतःला इजा करण्याचे विचार येत असतील, तर वाट न पाहता तातडीने मदत घ्यावी.

### मदतीसाठी आज हे मार्ग उपलब्ध आहेतः

- Tele-MANAS (१४४१६): दूरध्वनीवरून मानसिक आरोग्यविषयक मदत आणि समुपदेशन. जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम : जिल्हा पातळीवर तपासणी, उपचार, औषधे, समुपदेशन आणि जनजागृती. मानसिक आरोग्य सेवा कायदा, २०१७: मानसिक आजार असलेल्या व्यक्तीला उपचार, सन्मान, गोपनीयता, भेदभावापासून संरक्षण आणि सेवा मिळवण्याचा हक्क देतो. दिव्यांगत्व प्रमाणपत्र आणि UDID : काही मानसिक आजारांमध्ये पात्रतेनुसार विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण : गरजू व्यक्तींना मोफत कायदेशीर मदत.उपचार आणि तपासणीसाठी जिल्हा रुग्णालय, जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम आणि प्रादेशिक मनोरुग्णालये येथे संपर्क साधता येतो.

### आजपासून पाच पावले

जनजागृती म्हणजे केवळ एका दिवसाचा किंवा एका सप्ताहाचा कार्यक्रम नाही. संवेदनशील भाषा आणि सहानुभूती आपल्या रोजच्या जगण्याचा भाग झाली पाहिजे. त्यासाठी या मानसिक आरोग्य दिनापासून पाच छोट्या गोष्टींची सुरुवात करूयाः

१.ऐकाः कुणी बोलत असेल, तर मध्येच निर्णय देऊ नका.

२.समजून घ्याः मानसिक आजाराकडे दोष किंवा कलंक म्हणून पाहू नका.

३.उपचाराकडे वळवाः गरज असल्यास तज्ज्ञांची मदत घ्यायला प्रोत्साहन द्या.

४.साथ द्याः उपचारानंतरही त्या व्यक्तीला समाजात स्वीकारा.

५.सन्मान द्याः व्यक्तीला तिच्या आजाराने नव्हे, तर तिच्या व्यक्तिमत्त्वाने ओळखा.

मानसिक आजार ओळखता येतो, त्यावर उपचार करता येतात आणि त्यातून सावरून माणूस सन्मानाने जगू शकतो. त्यासाठी हवे आहे लवकर निदान, नियमित उपचार, कुटुंबाचा आधार, समाजाचा स्वीकार, पुनर्वसन आणि सर्वात महत्त्वाचा कलंकमुक्त दृष्टिकोन. मानसिक आजार असलेल्या व्यक्तीला दया नको; तिला समजून घेणे, उपचार, संधी आणि सन्मान हवा आहे.

आधी त्यांचे ऐकूया, मग समजून घेऊया, साथ देऊया, आणि एकजुटीने खरा बदल घडवूया.

थोडक्यात

## तोंडली जि प शाळेची मुख्याध्यापिका व कवयित्री अनुराधा धुर्डे यांच्या रामटेक येथील राज्यस्तरीय कवी संमेलनात सन्मान



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, पुणे, विदर्भ प्रांताच्या वतीने आयोजित १८ व्या राज्यस्तरीय छत्रपती संभाजी महाराज साहित्य संमेलनाचे रामटेक येथील स्व. धनश्यामराव किमतकर सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात नुकतेच आयोजन करण्यात आले होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिका उषा राऊत, स्वागताध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक सुभाष चव्हाण, तर निमंत्रक म्हणून विदर्भ प्रांताचे कार्याध्यक्ष नामदेव राठोड उपस्थित होते. या संमेलनात महाराष्ट्रातील विविध भागांतील कवींनी सहभाग नोंदवत आपल्या कविता सादर केल्या.या राज्यस्तरीय कवी संमेलनात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथील मुख्याध्यापिका व कवयित्री अनुराधा धुर्डे यांनी 'अनुताई' या टोपणनावाने सहभाग नोंदविला. त्यांनी 'काय दोष होता त्या माऊलीचा?' या सत्य परिस्थितीवर आधारित सामाजिक आशयाच्या कवितेचे प्रभावी सादरीकरण केले.

अनुताई यांच्या लेखणीची वैशिष्ट्ये म्हणजे सत्य परिस्थितीची जाण, परखडपणा, सामाजिक वास्तवावर प्रश्न उपस्थित करण्याचे धाडस आणि समाजप्रबोधनाची भूमिका. त्यांच्या कविता केवळ भावनिक अभिव्यक्ती न राहता विद्यार्थी घडविणे, समाज घडविणे आणि सामाजिक जाणीव जागृत करण्याचा संदेश देतात.त्यांच्या आशयपूर्ण व प्रभावी कविता सादरीकरणाची दखल घेत आयोजकांच्या वतीने सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन कवयित्री अनुराधा धुर्डे यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत असतानाच साहित्य क्षेत्रातही आपल्या संवेदनशील आणि परखड लेखणीने सामाजिक वास्तव मांडणाऱ्या अनुराधा धुर्डे यांच्या या साहित्यिक यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे, हे विशेष!

## मौदा येथे सेवा ज्योति यात्रा



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुख्यमंत्री ते प्रधानमंत्री या २५ वर्षांच्या राष्ट्रसेवेच्या कार्यकाळानिमित्त कामठी विधानसभा अंतर्गत मौदा येथे सेवा ज्योति कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने भव्य बाईक रॅली काढण्यात आली. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लाईव्ह संबोधनाचा सर्वांनी लाभ घेतला. कार्यक्रमात मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा,संजयजी भेंडे आमदार, आनंदराव राऊत जिलाध्यक्ष, भाजपा नागपूर जिल्हा,टेकचंद सावरकर माजी आमदार यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंतप्रधान मोदींच्या २५ वर्षांच्या सेवाकार्याचा गौरव आणि विकसित भारताच्या संकल्पाला बळ देणारी ही 'सेवा ज्योति यात्रा' निश्चितच प्रेरणादायी ठरल्याचे मत माजी तालुका भाजपा मौदा मंडळ अध्यक्ष मुकेश अग्रवाल यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

## खात - रेवराल जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या गणेश उत्सव मंडळांना वर्गणीचे अग्रवाल दाम्पत्याकडून वितरण



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

खात - रेवराल जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या गावातील विविध भागातील गणेश मंडळांना चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून आलेली वर्गणी माजी भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष मुकेश अग्रवाल, माजी जिल्हा परिषद सदस्य राधा मुकेश अग्रवाल यांच्याहस्ते प्रदान करण्यात आली. या शुभप्रसंगी मंडळांना भेट देऊन श्री गणेशाचे दर्शन घेण्यात आले. तसेच, सध्याच्या दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतकऱ्यांवर आलेल्या संकटातून लवकरात लवकर सुटका होऊ दे आणि सर्वांवर बाप्पाची कृपा राहू दे, अशी प्रार्थना करण्यात आली. या कार्यक्रमादरम्यान संबंधित गावांमधील गणेश मंडळांचे पदाधिकारी, तरुण कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वर्गणी वितरण सोहळ्यादरम्यान गावकऱ्यांमध्ये कमालीचा उत्साह दिसून आला.

खात - रेवराळ सर्कल अंतर्गत येणाऱ्या गावातील सहभागी गणेश मंडळे आणि अध्यक्षांमध्ये बाळगोपाल गणेश उत्सव मंडळ (खात वॉर्ड क्र. ४): अध्यक्ष - सचिन समरीत, बाळगोपाल गणेश उत्सव मंडळ (खात वॉर्ड क्र. २): अध्यक्ष - योगेश देवतारे, श्री संत तुकाराम गणेश उत्सव मंडळ (खात वॉर्ड क्र. ३): अध्यक्ष - मयूर धांडे, बाल गणेश उत्सव मंडळ (देवमुंढरी): अध्यक्ष - एकनाथ पंचबुधे, नायुग गणेश उत्सव मंडळ (धर्मापुरी): अध्यक्ष - संतोष पडोळे, भाऊ गणेश उत्सव मंडळ (खंडाळा): अध्यक्ष - अर्जुन महानंद, बाल गणेश उत्सव मंडळ (खंडाळा): अध्यक्ष - चक्रधर गभणे, बाल गणेश उत्सव मंडळ (नवरगाव): अध्यक्ष - संजय श्रीरसागर, बाल गणेश उत्सव मंडळ (सुंदरगाव): अध्यक्ष - ज्ञानेन्द्र मेश्राम, श्री गणेश उत्सव मंडळ (मांगली तेली): अध्यक्ष - संदीप फटिंग यांच्या समावेश आहे.

# नागपूर पदवीधर मतदार यादीतील कथित घोळ प्रकरणाला मोठे वळण!

**याचिका नागपूर खंडपीठातून मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींसमोर सुनावणीसाठी वर्ग, याचिकाकर्ते सचिन शंकरराव काळबांडे यांची न्यायालयीन लढाई सुरूच.**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीतील कथित अनियमिततेविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेला आता महत्त्वाचे वळण मिळाले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आज झालेल्या सुनावणीनंतर हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथील मुख्य न्यायमूर्तींसमोर सुनावणीसाठी वर्ग करण्यात आल्याची माहिती याचिकाकर्ते सचिन शंकरराव काळबांडे यांनी दिली.

मतदार नोंदणीतील कथित अनियमितता, प्रलंबित अर्ज आणि अंतिम मतदार यादीच्या उपलब्धतेबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांमुळे या प्रकरणाकडे राजकीय वतुर्ळासह पदवीधर मतदारांचे लक्ष लागले आहे. आता मुंबई येथे होणाऱ्या पुढील न्यायालयीन कार्यवाहीत या प्रकरणाला कोणती दिशा मिळते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

**काय आहे नेमके प्रकरण?**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी झालेल्या मतदार नोंदणी प्रक्रियेबाबत आक्षेप घेत नागपूर येथील सचिन शंकरराव काळबांडे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल केली आहे. याचिकेत मांडलेल्या दाव्यानुसार, मतदार नोंदणीची प्रक्रिया आणि अंतिम मतदार यादी तयार करण्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होतात. अंतिम मतदार यादी जाहीर होण्यासंबंधीची स्थिती, मोठ्या प्रमाणातील प्रलंबित अर्ज आणि निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता या मुद्द्यांवर याचिकाकर्त्याने न्यायालयाचे लक्ष वेधले आहे.

याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, मतदार नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्याबाबत स्पष्टता नसताना निवडणुकीची पुढील प्रक्रिया राबविणे योग्य आहे का, हा या प्रकरणातील प्रमुख प्रश्न आहे.

**९८ हजार ७८२ अर्जांचा मुद्दा न्यायालयीन लढाईच्या केंद्रस्थानी**

या प्रकरणात सर्वाधिक चर्चेत असलेला मुद्दा म्हणजे मतदार नोंदणी अर्जांची संख्या. याचिकेतील आकडेवारीनुसार, नागपूर विभागात ९८ हजार ७८२ अर्ज प्रलंबित असल्याचा दावा करण्यात आला आहे. यापैकी ६७ हजार ३१५ अर्ज नागपूर जिल्ह्यातील असल्याचे याचिकेत नमूद आहे. एवढ्या मोठ्या संख्येतील अर्जांची नोंदणी, छाननी आणि अंतिम मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया याबाबत याचिकाकर्त्याने प्रश्न उपस्थित केले आहेत.

या आकडेवारीची अधिकृत पडताळणी आणि संबंधित यंत्रणेची भूमिका महत्त्वाची ठरणार असून, याचिकेतील दाव्यांवर न्यायालय काय भूमिका घेते, याकडे आता लक्ष लागले आहे. याचिकाकर्ते प्रा. सचिन शंकरराव काळबांडे यांच्या वतीने अधिवक्ता ईश्वरदास के. दाऊदसरे यांनी बाजू मांडली आहे. मतदार नोंदणी प्रक्रियेतील कथित अनियमिततेबाबत न्यायालयीन हस्तक्षेपाची मागणी करणाऱ्या या याचिकेत अंतिम मतदार यादीचा मुद्दा महत्त्वाचा आहे.

याचिकेत अंतिम मतदार यादी पूर्ण होईपर्यंत निवडणूक पुढे ढकलणे, उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत वाढविणे आणि याचिका प्रलंबित असेपर्यंत निवडणूक प्रक्रियेला स्थगिती देणे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. मात्र, या मागण्यांवर न्यायालयाने अंतिम निर्णय दिल्याची माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे याचिका वर्ग होणे आणि निवडणुकीला स्थगिती मिळणे या दोन वेगळ्या बाबी असल्याचे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

**नागपूर खंडपीठातून मुंबईत वर्ग; पुढे काय होणार?**

आजच्या सुनावणीनंतर हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई येथील मुख्य न्यायमूर्तींसमोर सुनावणीसाठी वर्ग करण्यात आल्याची माहिती याचिकाकर्ते यांनी दिली. या घडामोडीमुळे आता पुढील सुनावणीची तारीख, न्यायालयासमोर होणारी मांडणी आणि याचिकेतील मागण्यांवर होणारी कार्यवाही यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रकरण मुख्य न्यायमूर्तींसमोर वर्ग झाले असले, तरी त्यावर अद्याप कोणता अंतिम आदेश देण्यात आला आहे, याची स्वतंत्र अधिकृत पुष्टी उपलब्ध नाही. त्यामुळे पुढील न्यायालयीन आदेशानंतरच या प्रकरणाची दिशा अधिक स्पष्ट होईल.

**निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेचा प्रश्न ऐरणीवर**

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदार यादीला अनन्यसाधारण महत्त्व असते. त्यामुळे मतदार नोंदणीतील कथित त्रुटी, अर्जांची छाननी आणि अंतिम मतदार यादीची स्थिती याबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मिळणे आवश्यक आहे.

सचिन शंकरराव काळबांडे यांनी दाखल केलेल्या याचिकेमुळे हा मुद्दा न्यायालयीन प्रक्रियेत पोहोचला आहे. आता मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींसमोर या प्रकरणात पुढे काय घडते, याकडे नागपूर विभागातील पदवीधर मतदार, संभाव्य उमेदवार आणि राजकीय पक्षाचे लक्ष राहणार आहे. मतदार नोंदणी प्रक्रियेबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे अधिकृतरीत्या कधी मिळणार? अंतिम मतदार यादीच्या स्थितीबाबत स्पष्टता येणार का? आणि निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत न्यायालय कोणती भूमिका घेणार? या प्रश्नांची उत्तरे पुढील सुनावणीतून मिळण्याची अपेक्षा आहे.

# वन्यजीव सप्ताहाचा समारोप, बानोरचंद्रमध्ये पशुलसीकरणाचा उपक्रम!

**पाळीव जनावरांना मिनरल्स व व्हिटॅमिन्सचे वाटप, मानव-वन्यजीव सहअस्तित्वाचा वनविभागाचा संदेश**

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

वन्यजीवांचे संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि मानव-वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी करण्याच्या उद्देशाने वनविभागाच्यावतीने वन्यजीव सप्ताहाच्या समारोपानिमित्त नरखेड वनपरिक्षेत्रातील बानोरचंद्र येथे विशेष उपक्रम राबविण्यात आला. गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी आयोजित या उपक्रमांतर्गत पाळीव जनावरांसह कुत्र्यांचे लसीकरण करण्यात आले. तसेच पशुपालकांना जनावरांच्या आरोग्यासाठी आवश्यक मिनरल्स व व्हिटॅमिन्सचे वाटप करून पशुआरोग्य आणि वन्यजीव संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

वनविभागाच्या वतीने २ ते ८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाच्या अखेरच्या दिवशी बानोरचंद्र येथे पशुआरोग्य आणि वन्यजीव संरक्षण यांची सांगड घालणारा हा उपक्रम राबविण्यात आला. डॉ. विनिता व्यास, उपवनसंरक्षक, नागपूर आणि संदीप भारती, सहाय्यक वनसंरक्षक, काटोल यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



ग्रामीण भागात पशुधन हे शेतकरी आणि पशुपालकांच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. जनावरांचे आरोग्य चांगले राहिल्यास पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळण्यास मदत होते. याच उद्देशाने जनावरांना आवश्यक पोषणघटक उपलब्ध करून देण्यासाठी मिनरल्स व व्हिटॅमिन्सचे वाटप करण्यात आले. तसेच पाळीव जनावरे आणि कुत्र्यांचे लसीकरण करून रोगप्रतिबंधक उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात आली.

**मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यावर भर**

वन्यप्राण्यांचा नैसर्गिक अधिवास सुरक्षित ठेवणे, जैवविविधतेचे रक्षण करणे आणि वन्यजीवांविषयी नागरिकांमध्ये संवेदनशीलता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असून, वन्यजीवांचे अस्तित्व टिकविण्यासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत. वन्यजीव सप्ताहाच्या माध्यमातून वनविभागाने नागरिकांपर्यंत हा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

वन्यजीव संरक्षणाबरोबरच पाळीव प्राण्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांचे वेळेवर लसीकरण करणे आणि त्यांना संतुलित पोषण देणे याबाबतही पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे पशुआरोग्याविषयी जागरूकता वाढण्यास मदत होणार असून, बानोरचंद्र येथील नागरिक आणि पशुपालकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाला नरखेडचे वनपरिक्षेत्र अधिकारी एफ. आर. आझमी, मेंढला येथील पशुवैद्यकीय अधिकारी साबे, क्षेत्र सहाय्यक व्ही. व्ही. येळमे, नरखेडचे क्षेत्र सहाय्यक नान्हे, गोरेवाडा रेस्क्यू टीम तसेच नरखेड वनपरिक्षेत्रातील वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. वन्यजीवांचे संरक्षण आणि पशुधनाचे आरोग्य या दोन्ही बाबींना महत्त्व देणाऱ्या या उपक्रमातून निसर्गसंवर्धना सोबतच ग्रामीण भागातील पशुपालकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्याचा सकारात्मक प्रयत्न करण्यात आला.

## जल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत भार्गव वेदप्रकाश मोकद्दमने मिळविले तीन सुवर्णपदके

**भार्गव मोकद्दमचे यश हे संस्था व शाळेसाठी अभिमानाचा क्षण : माजी आमदार आनंदराव देशमुख व सचिव मयंक देशमुख यांचे गौरवोद्गार**



**दै. सिंहवाणी वृतत, रामटेक**

राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक येथील वर्ग आठवीचा विद्यार्थी भार्गव वेदप्रकाश मोकद्दम याने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,नागपूर यांच्या तर्फे जलतरण तलाव अंबाझरी नागपूर येथे घेण्यात आलेल्या जिल्हा जलतरण १४ वर्षाखालील स्पर्धेत १) दोनशे मिटर बॅकस्टकमध्ये नागपूर जिल्ह्यात प्रथम २) १०० मिटर बॅकस्टक नागपूर जिल्ह्यात प्रथम ३) २०० मिटर मध्ये वैयक्तिक मेडिलेमध्ये अशा तीन स्पर्धेत एकूण तीन सुवर्णपदक प्राप्त केले.वर्धा येथे होणाऱ्या विभागीय जलतरण स्पर्धेसाठी भार्गवची निवड झाली हे विशेष.

या यशाचे श्रेय त्याने आपले वडील वेदप्रकाश मोकद्दम, आई सौ.सुचिता,बहीण सर्वज्ञा आणि प्रशिक्षक आनंद भोसले यांना दिलेले आहे. त्याच्या या प्रशंसानीय यशाबद्दल प्राचार्य रविंद्र चन्ने, पर्यवेक्षक शैलेश परमार, क्रीडा शिक्षक राजेश भोतमांगे,सर्व शिक्षक शिक्षिका व कर्मचारी वर्गाने पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. याप्रसंगी राष्ट्रीय आदर्श विद्यालय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार आनंदराव देशमुख, सचिव मयंक देशमुख, उपाध्यक्ष व नगरसेवक अंशुल देशमुख व संचालक मंडळातील सदस्य घनश्याम बर्वे, आशिष थोटे व सर्व सदस्यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

# १४ व १५ नोव्हेंबर रोजी अमरावतीत रंगणार सर्जनशील शब्दवेलचे सहावे साहित्य संमेलन

**दै. सिंहवाणी वृत्त, पनवेल**

मराठी साहित्याच्या विविध प्रवाहांना एकत्र आणत नवोदित आणि ज्येष्ठ साहित्यिकांमध्ये वैचारिक संवाद घडवून आणण्यासाठी दिनांक १४ व १५ नोव्हेंबर २०२६ रोजी शब्दवेलचे सहावे राज्यस्तरीय साहित्य संमेलन यशवंतराव चव्हाण सेंटर, अमरावती व सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, पनवेल यांचे संयुक्त विद्यमाने श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांच्या सहयोगाने अमरावती येथे आयोजित करण्यात आले आहे. दोन दिवसीय या साहित्य संमेलनात साहित्य, विचार, संस्कृती आणि सामाजिक जाणिवांचा जागर घडणार असून राज्यभरातील साहित्यिक आणि साहित्यप्रेमींचे लक्ष या संमेलनाकडे लागले आहे.

या संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक इंद्रजीत भालेराव यांची नियोजित निवड करण्यात आली आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक ,साहित्य अकादमी नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ.प्रमोद मुनघाटे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. संमेलनाचे मुख्य संरक्षक श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तथा यशवंतराव चव्हाण सेंटर अमरावती चे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख असून संमेलनाचे प्रमुख अतिथी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष श्री दिलीपराव इंगोले, यशंतराव चव्हाण सेंटर अमरावतीचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. रमेश अंधारे, प्रदीप देशमुख व इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी प्राचार्य डॉ महेंद्र मेटे यांनी स्वीकारली असून डॉ. राजेश मिरगे हे कार्याध्यक्ष म्हणून संमेलनाच्या आयोजनाची धुरा सांभाळणार आहेत.

सर्जनशील शब्दवेल साहित्य संघाने अल्पावधीतच साहित्य क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली असून विविध साहित्यिक उपक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील साहित्यिकांना एकत्र आणण्याचे काम सातत्याने केले आहे. संस्थेच्या वतीने यापूर्वी ठाणे, पनवेल, पुणे आणि सातारा येथे साहित्य संमेलनांचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनांच्या माध्यमातून साहित्यिक अभिव्यक्तीला व्यासपीठ मिळण्याबरोबरच विविध साहित्यप्रवाहांवर चर्चा आणि विचारांची देवाणघेवाण घडून आली आहे. संस्थेच्या यापूर्वीच्या साहित्य संमेलनांना साहित्यविश्वातील मान्यवरांची उपस्थिती लाभली आहे. ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे, डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, प्रा. प्रतिभा सराफ, अरुण म्हात्रे, आसावरी काकडे, पुष्पराज गावंडे धनराज वंजारी आणि ए. के. शेख यांसारख्या साहित्यिकांनी विविध संमेलनांमध्ये सहभाग नोंदविला आहे. त्यामुळे सर्जनशील शब्दवेलच्या साहित्य संमेलनांची साहित्य क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

अमरावती येथे होणारे आगामी संमेलनही साहित्यिकांसाठी वैचारिक आणि साहित्यिक मेजवानी ठरणार आहे. दोन दिवसांच्या या संमेलनात विविध साहित्यिक उपक्रम, विचारविनिमय आणि साहित्याशी निगडित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. ज्येष्ठ साहित्यिकांच्या अनुभवांचे मार्गदर्शन, नवोदित साहित्यिकांच्या लेखनाला प्रोत्साहन तसेच विविध साहित्यप्रकारांवर चिंतन-मनन करण्याची संधी या संमेलनातून उपलब्ध होणार आहे.

आजच्या बदलत्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीत सर्जनशील शब्दवेल साहित्य संघाच्या माध्यमातून आयोजित होणाऱ्या या संमेलनात महाराष्ट्राच्या विविध भागांतून साहित्यिक आणि साहित्यप्रेमी सहभागी होण्याची अपेक्षा आहे. ज्येष्ठ साहित्यिकांच्या उपस्थितीमुळे तसेच विविध साहित्यिक उपक्रमांमुळे हे संमेलन साहित्यप्रेमींसाठी समृद्ध अनुभव देणारे ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. साहित्यिकांनी, कवी-लेखकांनी, वाचकांनी आणि साहित्यप्रेमींनी या सहाव्या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, पनवेलचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर यांनी केले आहे.

थोडक्यात

## वाडीत २ दिवसीय तहसील शालेय कराटे स्पर्धेला उत्साहात प्रारंभ

### ७० शाळा, ४०० खेळाडू सहभागी



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

क्रीडा युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय नागपूरच्या वतीने वाडीतील पुण्याई सभागृहात शुक्रवार दि. ९ ऑक्टोंबरला २ दिवसीय तालुकास्तरीय शालेय कराटे स्पर्धेला उत्साहात प्रारंभ झाला. आयोजन समितीचे प्रमुख पदाधिकारी तालुका समन्वयक उमेश चौरे, जिल्हा कराटे असोसिएशनचे सचिव शाबीर शहा, उपाध्यक्ष रविकांत मेश्राम कोषाध्यक्ष राजेश लारोकर जिल्हा कराटे असोसिएशनचे पदाधिकारी मनिष येवले यांच्या मार्गदर्शनात स्पर्धा स्थळी आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली होती. प्रस्तावनेत उमेश चौरे यांनी सांगितले की, या नागपूर तहसील मधील एकूण ७० शाळेचे ४०० शालेय कराटे पटू यात सामील होणार आहे.

या स्पर्धेचे दीपप्रज्वलन करून व पहिला सामना प्रारंभ व उद्घघाटन वाडी नप च्या उपाध्यक्ष कल्पना सगदेव, सभापती ज्योती भोरकर,सरिता यादव,मनोरमा येवले, नगरसेवक आनंद बाबू कदम,केशव बांद्रे, नगरसेविका डॉक्टर किरण लांजेवार, प्राचार्य सुभाष खाकसे, सामाजिक कार्यकर्ते अरुण कराळे,नितीन वडीचार, डॉन गबरानी, आदित्य चिंचखेडे इ.अतिथी च्या उपस्थित संपन्न झाले. कराटे प्रशिक्षक व निर्णायक अमित शेंडे,धनंजय सरदार, विशाल राजपूत,नेहाल राजपूत, रोहित वंजारी, अल्पेश बावनकर, प्रवीण शिंगाडे,मोनाली सोनावणे, सिमरन शाह, नम्रता काले, लावण्या बावणे,श्रावणी कवाले, भाग्यश्री चौधरी, अथर्व तराळे, रूपाली भैरम यांच्या मार्गदर्शनात दिवसभर कराटे प्रकारातील विविध सामने उत्साहात संपन्न झाले. विजेत्या झालेल्या खेळाडूंना त्वरित उपस्थित अतिथी व आयोजकांच्या हस्ते मेडल पुरस्कार प्रदान करण्यात आले. सर्व गटातील मुलांचे कराटे सामने शनिवारी संपन्न होईल व दुपारनंतर पुरस्कार वितरण आणि समापन करण्यात होईल.

## ग्राम पंचायत निमखेडा येथील माजी सरपंचासह अनेकांचा शिवसेनेत प्रवेश

### शिवसेनेचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवा : राज्यमंत्री आशिष जयस्वाल



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्ववादी विचारांचा वारसा आणि महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत शुक्रवार दिनांक ०९ ऑक्टोंबर २०२६ रोजी मौदा तालुक्यातील निमखेडा येथील माजी सरपंच प्रकाश पिल्लेवार सह ग्रामपंचायत सदस्य व असंख्य मान्यवरांनी राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी बोलतांना राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले,उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांच्या सक्षम नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत अनेक लोक शिवसेनेशी जोडले जात आहेत. विधानसभा निवडणुकीतील शिवसेनेच्या दमदार कामगिरीनंतर पक्षात सातत्याने वाढणारा जनसमर्थनाचा ओघ ही पक्षाच्या नेतृत्वावरील विश्वासाची पावती आहे. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी, शिवसेनेचा विचार तळागाळापर्यंत पोह्चवण्यासाठी आणि जनतेच्या सेवेसाठी सक्रियपणे कार्य करण्याचे आवाहन केले.

राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या रामटेक येथिल जनसंपर्क कार्यालयात झालेल्या शिवसेना पक्षप्रवेशामध्ये प्रकाश पल्लेवार माजी सरपंच, ग्रा. पं. निमखेडा, पूर्णचंद्रराव वेमुरी ग्राम पं.सदस्य,भूमिका प्रकाश रहांगडाले ग्रा. पं. सदस्य,रक्षक खांडेकर, नंदकिशोर रामटेके,अशोक येंडापल्ली, मनोज दोरखंडे, राधेश्याम मरस्कोल्हे, सुधाकर कंडेपूल,सचिन घाटबांधे, सुजल नारनवरे, संजय घाटबांधे, चक्रधर चिंचूलकर, राजेंद्र अमृते, चंद्रशेखर हरोडे सह गावातील युवकांनी शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी राज्यमंत्री जयस्वाल सर्वांचे पक्षात स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी ज्ञानेश्वर चौरे माजी उप सभापती, पंचायत समिती मौदा,शिवसेना विभाग प्रमुख रामपाल किरपान, बळीराजा पांदन रस्ता योजनेचे सदस्य विकास झाडे व समाजसेवक बबलू टेंभरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## तेलकामठी येथे मतदार जागृती अभियान मेळावा

### पदवीधर मतदार संघाची निवडणूक २०२६

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद नागपूर ग्रामिण जिल्ह्यातर्फे उद्या दि. ९ ऑक्टोबरला शुक्रवारला मतदार जागृती अभियान मेळावा निल फार्म हाऊस तेलकामठी येथे कळमेश्वर व सावनेर तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने सायंकाळी ६.३० वाजता जिल्हा अध्यक्ष मीनानाथजी सातपुते यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला आहे. सावनेर व कळमेश्वर तालुक्यातील जास्तीतजास्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिक्षक परिषद सावनेर व कळमेश्वर तालुक्याच्या वतीने करण्यात येते.

राजीव तांदुळकर जिल्हा कार्यवाह, निसर्ग पवार अध्यक्ष सावनेर तालुका, राजेंद्र कुथे अध्यक्ष कळमेश्वर तालुका, संजय मोवाडे कार्यवाह सावनेर तालुका, प्रफुल श्रीराव कार्यवाह कळमेश्वर आयोजनास सहकार्य लाभत आहे.

# पदवीधरांच्या आत्मसन्मानासाठी हा लढा : प्रा. अनिल सोले

### मध्यवर्ती निवडणूक संपर्क कार्यालयाचे उद्घाटन, कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भाजपमधील निर्णयप्रक्रियेचे वाढते केंद्रीकरण, निष्ठावंत कार्यकर्त्यांकडे होणारे दुर्लक्ष आणि सामान्य व ज्येष्ठ कार्यकर्त्यांची होणारी घुसमट यामुळेच नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याचे प्रा. अनिल सोले यांनी स्पष्ट केले. शुक्रवारी महाल येथील मध्यवर्ती निवडणूक संपर्क कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

पंडित बच्छराज व्यास चौक (बडकस चौक), महाल येथील माजी आमदार गिरीश व्यास यांच्या कार्यालयात या संपर्क कार्यालयाचे भव्य उद्घाटन करण्यात आले. प्रा. सोले यांचे आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी, औक्षण आणि उत्स्फूर्त घोषणांनी त्यांचे स्वागत करण्यात आले. फीत कापून कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



गेल्या अनेक वर्षांपासून पदवीधर क्षेत्रात केलेले काम आणि सातत्यपूर्ण जनसंपर्क यांमुळे पदवीधर, कार्यकर्ते आणि समाजातील विविध घटकांशी आपले जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले आहेत. या काळात सामान्य कार्यकर्त्यांकडून व्यक्त झालेल्या भावना आणि अपेक्षांचा आदर करण्यासाठीच आपण निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याचे प्रा. सोले यांनी सांगितले. कार्यकर्त्यांशी आत्मीयतेचे संबंध जपणे आवश्यक आहे. विविध संघटनांशी संबंधित कार्यकर्त्यांचा पाठिंबा, ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि सुज्ञ मतदारांचा कौल यांमुळे निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी माजी आमदार गिरीश व्यास म्हणाले, ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. आम्ही आमची नैतिक भूमिका स्वीकारून पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. आम्ही भाजपचे कार्यकर्ते आहोत; मात्र कार्यकर्त्यांचा सन्मान आणि आत्मसन्मान जपण्यासाठी ही निवडणूक लढवत आहोत.ह्व प्रा. अनिल सोले यांना मोठ्या बहुमताने विजयी करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाला डॉ. गौरीशंकर पाराशर, माजी आमदार गिरीश व्यास, डॉ. श्याम पुंडे, प्रा. सत्यवान मेश्राम, डॉ.संजय दुधे, कवी प्रा. मनीष वाजपेयी, प्रा. राजेश बागडी, सुनील अग्रवाल,माजी महापौर किशोर डोरले, माजी उपमहापौर डॉ. रवींद्र भोयर, डॉ.महेश तिवारी, स्नेहल बिहारे, भोलानाथ सहारे, रविंद्र येनुरकर, योगेश बन, हरीष केवटे, नरेश कामडे, अनिल सारवे, मोहनीश राऊत,उपेंद्र वालदे, विलास त्रिवेदी, बाळासाहेब कुलकर्णी, राजू बाबरा, महेंद्र राऊत सुधीर दुबे, शैलेश ढोबळे, विवेक गर्गे, तुलाराम मेश्राम, पंकज वर्मा, मोहक पारवे,कार्तिक लारोकर, देवराव मांडवकर, यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. भोलानाथ सहारे यांनी कार्यालयप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळतील.. संचालन योगेश बन यांनी तर आभार प्रदर्शन नरेश कामडे यांनी केले.

## खुनाच्या गुन्हयातील आरोपीला न्यायालयाने सुनावली आजीवन कारावासाची शिक्षा

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

तालुक्यातील पोलीस स्टेशन खापा फिर्यादी लक्ष्मीकांत उर्फ बापुर मोतीलाल गागाटे, रा किल्लापुरा खापा यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे अप. क्र. ३२०/२०२५ कलम १०३(१) भा.न्या.सं. सह कलम ३,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, मृतक चेतन अशोक गागाटे, वय २५ वर्षे, रा. हनुमान घाट, शहापुरा, खापा, ता. सावनेर, जि. नागपुर याचे आरोपी अर्जुन देविदास निळे, वय ३० वर्षे, रा डोंगेघाट, खापा याच्याशी मागील ५ ते ७ वर्षांपासून सुरू असलेल्या वादातून वैमनस्य होते. आरोपी अर्जुन निळे याच्या अवैध व्यवसायात मृतक चेतन हा



मृतक चेतन गागाटे

बाधक ठरत असल्याने आरोपीने चेतन यास जीवे मारण्याची धमकी दिली होती. दिनांक १३/०६/२०२५ व १४/०६/२०२५ रोजी खापा येथील बाजारपेठेत आरोपीने चेतन यास धमकावून त्याच्याशी वाद घातला होता. दिनांक १५/०६/२०२५ रोजी खापा बाजारपेठेत चेतन व आरोपी अर्जुन निळे यांच्यात वाद झाला त्या वादामध्ये अर्जुन निळे याने चेतनचा पाठलाग करून त्याचेवर अग्निशस्त्राने वार करून त्याचा खुन केला.

तपासी अधिकारी अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा (तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर) आणि सागर खर्डे, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक ०९/१०/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश १४ बी. एम. धानुरे यांनी नमुद आरोपी अर्जुन देविदास निळे, वय ३० वर्षे, रा डोंगेघाट, खापा कलम १०३(१) भान्यासं अन्वये आजीवन कारावास व १०००/- रुपए दंड, दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सरकारचेवतीने ए.पी.पी. नितीन तेलगोटे काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, पोलीस निरीक्षक चंद्रकांत काळे प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा, पोलीस निरीक्षक विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा. पोलीस निरीक्षक विशांत नांदगाये, पोहवा श्री गणेश भुरे, ब.नं १५८२, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण तसेच मपोना वर्षा धुर्मळ, ब.नं १७१७, पैरवी अधिकारी, खापा पोलीस स्टेशन यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

## आयआयटी मुंबई कॅम्पसमध्ये गॅस गळतीमुळे आग

**पवई :** मुंबईतील पवई येथील आयआयटी कॅम्पसमध्ये गुरुवारी रात्री गॅस सिलेंडर गळतीमुळे आग लागली. या आगीत दोन मुलांसह पाच जण भाजले. कॅम्पसच्या आवारातील एका बांधकाम साईटवरील मजुरांच्या झोपडीत सिलिंडरमधून गॅस गळती झाल्याने ही आग लागली. सर्व जखमींना उपचारासाठी घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गुरुवारी रात्री १०.२४ वाजता गॅस गळतीमुळे आग लागली. यावेळी तिथे खेळत असलेली दोन मुले आगीत भाजली. मुलांच्या किंकाळ्या ऐकून त्यांना वाचवण्यासाठी गेलेले तीन मजूरही या आगीत भाजले.

## हिवरा अंगणवाडीत पोषण माह अभियान उत्साहात

### पौष्टिक आहाराचे प्रात्यक्षिक व धान्य-कडधान्यांपासून आकर्षक रांगोळी



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

तालुक्यातील पोषण माह अभियानांतर्गत मनसर बीट येथील हिवरा-हिवरी अंगणवाडीत पोषणविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात गरोदर महिला, स्तनदा माता, किशोरी मुली, पालक महिला आणि बालकांसाठी पौष्टिक आहाराचे प्रात्यक्षिक व प्रदर्शनी मांडण्यात आली. यावेळी महिलांना संतुलित व पौष्टिक आहाराचे महत्त्व, वजन व उंचीचे मोजमाप, कुपोषणाची कारणे व प्रतिबंध तसेच बालकांच्या आहाराची योग्य काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विविध प्रकारची धान्ये व कडधान्ये यांचा वापर करून आकर्षक रांगोळी साकारण्यात आली होती. या उपक्रमातून पौष्टिक आहाराचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी मुख्याध्यापक सचिन चव्हाण, ग्रामपंचायत अधिकारी विरेंद्र ठवरे आणि पर्यवेक्षिका पुष्पलता उमाळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अंगणवाडी सेविका मोहना चाफले यांनी केले, तर ज्योती मालाधारी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अनिता आकरे, मंगला गायधने, सोनाली आगलावे, स्वाती हिंगे, लीला तायवाडे, आकांक्षा चव्हाण, मोहिनी गिरडकर, प्रमिला देव्हारे, गुंजन भोंडे, करिश्मा जांभुळे, रीना सोनटक्के, माया चौधरी, प्रिया राऊत यांच्यासह अनेक महिलांनी सहकार्य केले. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग आणि पौष्टिक आहाराविषयी जनजागृती यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला.

## कौशल्यविकास विभाग विश्वविक्रमासाठी सज्ज! 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज'ला मिळतोय युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : मंत्री मंगल प्रभात लोढा

### ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

केंद्रीय कौशल्य विभागामार्फत आदरणीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसा निमित्त देशभरात सुरू असलेल्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज या बहुराज्यीय नवोपक्रम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या मार्फत महाराष्ट्रात देखील या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. २१ सप्टेंबर पासून अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत ऑनलाईन माध्यमातून अर्ज करता येणार आहे.

या स्पर्धेत नवोन्मेषक, विद्यार्थी, विद्यार्थी गट, संशोधक, प्राध्यापक, स्टार्टअप्स, एमएसएमई, कंपन्या, सामाजिक संस्था, शैक्षणिक व संशोधन संस्था तसेच इतर इनोव्हेशन टीम्स या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. या चॅलेंज च्या माध्यमातून कृषी, आरोग्य, महिला सुरक्षा, नागरी विकास, पर्यावरण, संरक्षण, कृत्रिम बुध्दिमत्ता, शिक्षण आणि रोजगारक्षमता अशा विविध क्षेत्रातील समस्या समजून सर्जनशील उपाय देणाची संधी शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

"सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंजसाठी कोणत्याही प्रकारची वयोमर्यादा नसून प्रत्येकाच्या सर्जनशीलतेला संधी मिळणार आहेत. विद्यार्थ्यांच्या नवोन्मेषांना राज्यस्तरीय व्यासपीठ असून या मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे हीच आमची इच्छा आहे. आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या निदेर्शानुसार विशेषतः ग्रामीण भागातील मुलांचा यामध्ये सहभाग वाढवण्यासाठी आम्ही कार्यरत आहोत" असे मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले. सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज या स्पधेर्साठी महाराष्ट्रातून आतापर्यंत तीन हजारांहून अधिक विद्यार्थी, युवक व युवतींनी नोंदणी केली. तसेच गोवा, दिव-दमण आणि छत्तीसगड या राज्यांतून सहा हजारांहून अधिक विद्यार्थी, युवक व युवतींनी या स्पधेर्साठी नोंदणी केली. विशेष म्हणजे, ग्रामीण भागातील विद्यार्थी, युवक व युवतींकडूनही या स्पधेर्ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, नवकल्पना आणि संशोधनाच्या माध्यमातून आपल्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांचा सहभाग वाढत आहे, असेही मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

**अर्ज कसा करावा ?**

या स्पर्धेमध्ये ऑनलाईन माध्यमातून विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे. https://sevainnovationchÔll enge.in/ या लिंक च्या माध्यमातून अथवा क्यू आर कोड स्कॅन करून इच्छुक स्पधेर्साठी आपला प्रकल्प सादर करू शकतात. या पोर्टलवर पहिल्या स्तरावर प्राथमिक माहिती नोंदणीसाठी आवश्यक असेल



तसेच दुसऱ्या स्तरावर प्रकल्प सादर करतांना आधार संलग्न वैयक्तीक माहिती व प्रकल्पाची माहिती उमेदवारांना सादर करावी लागणार आहे. सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होणार असून उमेदवारांच्या शंकेचे निरसन करण्यासाठी चॅट बॉट सुविधा सुद्धा संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंजमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी दोन महत्वाचे सामंजस्य करार**

आज मंत्रालयात सृजन ट्रस्ट, पुणे आणि विज्ञान भारती कोकण प्रांत या दोन्ही संस्थांसह कौशल्य विकास विभागाने सामंजस्य करार केला. या संस्थांच्या मदतीने स्पधेर्साठी युवकांची विश्वविक्रमी नोंदणी होणार आहे असा विश्वास मंत्री लोढा यांनी यावेळी व्यक्त केला. सामंजस्य कराराच्या माध्यमातून 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज'ची माहिती अधिकाधिक युवक-युवतींपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येणार असून, त्यांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सृजन ट्रस्ट, पुणे आणि विज्ञान भारती कोकण प्रांत या दोन्ही संस्थां सहकार्य करणार आहे. प्रोजेक्ट रीपोर्ट तयार करणे, तसेच स्पर्धेसाठी आवश्यक मार्गदर्शन सुद्धा विज्ञान भारती कोकण प्रांत संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना मिळणार आहे. सृजन ट्रस्टच्या माध्यमातून या स्पधेर्चा व्यापक प्रचार व प्रसार करून युवक- युवतींचा सहभाग वाढविण्यात येणार आहे.

सृजन ट्रस्टतर्फे दरवर्षी डिपेक्स या उपक्रमाच्या माध्यमातून नवकल्पना, स्टार्टअप आणि उद्योजकतेच्या क्षेत्रातील युवकांसाठी परिषद आयोजित केली जाते. या उपक्रमामुळे नवकल्पना, संशोधन, स्टार्टअप आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या मोठ्या संख्येने युवक-युवतींशी ट्रस्टचा संपर्क आहे. सृजन ट्रस्टचे विश्वस्त दीपक मुकादम, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.अपूर्वा पालकर, सृजन ट्रस्टचे डॉ. अमित नेहते यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# दुष्काळग्रस्त ३६ तालुक्यांचे पुन्हा सर्वेक्षण

## २० टक्के ग्राउंड ट्रुथिंगचा शासन निर्णय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने निर्णय, केंद्राच्या पथकासमोर राज्यातील पीक नुकसानीची वस्तुस्थिती मांडली : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर यापूर्वीच्या २६५ तालुक्यांच्या यादीबाहेरील आणखी ३६ तालुक्यांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी दुष्काळाच्या निकषांबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या १८ तालुक्यांमध्ये २० टक्के ग्राउंड ट्रुथिंग अर्थात प्रत्यक्ष पडताळणी करून त्यांचाही दुष्काळी यादीत समावेश करण्याबाबत विचार केला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने यासंदर्भातील शासन निर्णय काढण्यात आला आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नागपुरात विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे म्हणाले की, याशिवाय आणखी १८ तालुक्यांची यादी प्राप्त झाली असून, त्याबाबत अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर या तालुक्यांमध्येही ग्राउंड ट्रुथिंग करून पुढील निर्णय घेतला जाईल. लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी केली होती. त्यांच्याकडून आलेल्या निवेदनांचा आणि शिफारशींचाही विचार करण्यात आला आहे.

**केंद्राच्या पथकाकडून दुष्काळी परिस्थितीची पाहणी**

केंद्र सरकारने महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची दखल घेऊन तातडीने पथके पाठविली आहेत. ही पथके राज्यातील परिस्थितीचे सर्वेक्षण करतील. केंद्राच्या पथकासोबत राज्यातील अधिकाऱ्यांची बैठक झाली असून, त्यात पीक नुकसानीचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले आहे. सोयाबीन, कापूस, तूर, हळद तसेच फळबागांचे नुकसान झाल्याची माहिती केंद्राच्या पथकाला देण्यात आली आहे.

दुष्काळाशी संबंधित सर्व निकष आणि नुकसानीची वस्तुस्थिती केंद्राच्या अधिकाऱ्यांसमोर मांडण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या प्रयत्नांतून महाराष्ट्राला केंद्राकडून मोठी मदत मिळेल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

**बंडखोरी रोखण्यासाठी महायुतीचे प्रयत्न**

विधान परिषद निवडणुकीतील बंडखोरीबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी निवडणुकीत बंडखोरी करू नये, यासाठी पक्षाचे प्रयत्न सुरू आहेत. बंडखोरी झाल्यास त्यासंदर्भातील निर्णय घेण्याचे अधिकार प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना आहेत.

भाजपचे नेते अनिल सोले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याच्या पार्श्वभूमीवर बावनकुळे यांनी त्यांना माघार घेण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, मागील बैठकीत आमची त्यांच्यासोबत चर्चा झाली होती. अनिल सोले अर्ज भरणार नाहीत, असे आम्हाला वाटले होते. मात्र, त्यांनी अर्ज दाखल केला. पक्षाने सुधाकर कोहळे यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. त्यामुळे अनिल सोले यांनी अधिकृत उमेदवाराविरोधात निवडणूक लढवू नये.

पक्ष हा आईसारखा असतो. राजकारणात कधी उमेदवारी मिळते, तर कधी मिळत नाही. माझ्याबाबतीतही असे घडले आहे. एका वेळी मला थांबविण्यात आले होते; मात्र, नंतर २०२४ मध्ये पक्षाने मला पुन्हा उमेदवारी दिली. यावेळी सुधाकर कोहळे यांना संधी देण्यात आली आहे. अनिल सोले हे प्रगल्भ नेते असून, त्यांनी पक्षाविरुद्ध भूमिका घेऊ नये, अशी माझी विनंती आहे. त्यांनी दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी मागे घ्यावी, अशी अपेक्षाही बावनकुळे यांनी व्यक्त केली.

अमरावती आणि पुणे शिक्षक मतदारसंघातील निवडणुकांबाबतही महायुतीच्या अधिकृत उमेदवारांविरोधात दाखल झालेले अर्ज मागे घेण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. ज्या ठिकाणी भाजप, शिवसेना किंवा राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांनी परस्परांविरोधात अर्ज दाखल केले आहेत, त्या ठिकाणी महायुतीचे नेते चर्चा करीत आहेत.

**सौरऊर्जा प्रकल्पांसाठी शेती महामंडळाची जमीन भाडेपट्ट्याने**

अहिल्यानगर जिल्ह्यात शेती महामंडळाच्या जमिनी सौरऊर्जा प्रकल्पांसह विविध कारणांसाठी भाडेपट्ट्याने देण्यात आल्याबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, संबंधित जमिनी वेगवेगळ्या संस्थांना आणि कंपन्यांना भाडेपट्ट्याने देण्यात आल्या आहेत. यामध्ये निबे ग्रुपला सुमारे दीड हजार एकर, संरक्षण संशोधन व विकास संस्थेला (डीआरडीओ) दीड हजार एकर, तर विश्वराज कंपनीला सुमारे बाराशे एकर जमीन देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शेती महामंडळाच्या जमिनींचा वापर आणि त्यांचे भाडेपट्टे याबाबत शासनाचे नियम आहेत. या जमिनींपैकी अडीच हजार एकर जमीन शेतकऱ्यांसाठी राखून ठेवण्यात आली आहे. मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांना जमीन परत देता येईल का, याबाबतही विचार सुरू असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**नागपुरात पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन**

नागपूर शहरातील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर बोलताना बावनकुळे यांनी नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले. दुष्काळी परिस्थितीत काही बाबतींत संयम ठेवावा लागतो. सिमेंट रस्त्यांची कामे बंद करण्यात आली असून, पिण्याच्या पाण्याचा अवास्तव वापर होऊ दिला जाणार नाही, असे त्यांनी सांगितले. बांधकामासाठी पिण्याचे पाणी वापरण्याऐवजी प्रक्रिया केलेले पाणी वापरावे. पिण्याच्या पाण्याचा अन्य कामांसाठी अनावश्यक वापर होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

नागपूरमध्ये सुमारे ३५ टक्के पाण्याचे ऑडिट होत नसल्याने पाणी वाया जात असल्याचे बावनकुळे यांनी नमूद केले. शहरात पाण्याची उपलब्धता पुरेशी असली, तरी तांत्रिक अडचणींमुळे काही ठिकाणी समस्या निर्माण होऊ शकतात. पाण्याचा अपव्यय रोखण्यासोबतच जलसंधारणावर भर देण्यात येत आहे. नागपूर जिल्ह्यातील सहा हजारांहून अधिक लहान बंधाऱ्यांची दुरुस्ती केल्यास जलसाठ्यात वाढ होऊ शकते. अशाच प्रकारचे काम राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असेही ते म्हणाले.

**पीककर्जमाफीसाठी शेतकऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण करणार**

पीककर्जमाफीच्या लाभापासून ई-केवायसीअभावी वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी गावनिहाय याद्या तयार करण्यात येणार आहेत. ज्या शेतकऱ्यांचे पीककर्जमाफीसाठी अर्ज मंजूर झाले आहेत, त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी तलाठी आणि ग्रामसेवक घरोघरी जाऊन ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करतील, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

राज्यातील पात्र शेतकऱ्यांच्या पीककर्जमाफीच्या याद्या टप्प्याटप्प्याने पुढे येत आहेत. मात्र, ई-केवायसी पूर्ण न झाल्यामुळे काही शेतकऱ्यांना लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे संबंधित गावांतील शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. नेटवर्क नसलेल्या ठिकाणी माहिती अपलोड केली आणि नंतर नेटवर्क उपलब्ध झाले, तर ती माहिती प्रणालीवर अद्ययावत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**एसआयआरवरून काँग्रेसवर टीका**

मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) मुद्द्यावरून बावनकुळे यांनी काँग्रेसवर टीका केली. ते म्हणाले की, मतदारयाद्यांचे शुद्धीकरण ही प्रक्रिया योग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे. मतदारयादीत काही त्रुटी राहिल्या असतील, तर त्या दुरुस्त करण्यासाठी वेळ उपलब्ध आहे. महाराष्ट्रात मतदारयादीतील दुरुस्त्यांसाठी निवडणूक आयोगाने वेळ वाढवून दिला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

एसआयआर आणि ईव्हीएमच्या मुद्द्यांवरून निवडणूक आयोगाला लक्ष्य करण्याऐवजी मतदारयादीतील त्रुटी दूर करण्यावर भर द्यावा, असे मत त्यांनी व्यक्त केले. निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था असून, तिच्याबाबत आरोप करताना तथ्यांचा विचार करणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले. सचिन वाझे प्रकरणात उच्च न्यायालयाच्या निरीक्षणांबाबत विचारले असता, न्यायालयाच्या निदर्शनास काही बाबी आल्यामुळे त्यांनी प्रश्न उपस्थित केला असावा, अशी प्रतिक्रिया बावनकुळे यांनी दिली.

---

थोडक्यात

## मोहम्मद रफी यांच्या गीतांचा सुरेल नजराणा ११ ऑक्टोबर रोजी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हामोर्नी इव्हेंट्सच्यावतीने महान पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या अजरामर गीतांचा सुरेल नजराणा रसिकांना अनुभवता यावा, यासाठी मोहम्मद रफी-१ या विशेष संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.१५ वाजता लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक हॉलमध्ये होणार आहे. कार्यक्रमात गायक व यूट्यूबर हेमंत गंडोले, तसेच स्वस्तिका ठाकूर आणि आकांक्षा नागरकर रफी यांच्या लोकप्रिय गीतांचे सादरीकरण करणार आहेत.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डिस्ट्रिक्ट बार असोसिएशन नागपूरचे अध्यक्ष प्रकाश जयस्वाल, लिंक बुक रेकॉर्ड होल्डर मोहन अय्यर, मधुकर पराते, फाल्गुन गजभिये व आयोजक रंजना गंडोले उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन श्वेता शेलगावकर करणार असून, कार्यक्रमाची संकल्पना हार्मोनी इव्हेंट्सचे राजेश समर्थ यांची आहे.मोहम्मद रफी यांच्या सदाबहार गीतांचा आनंद घेण्यासाठी संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आयोजकांनी आवाहन केले आहे. या विनामूल्य कार्यक्रमासाठी विशेष निमंत्रित पास उपलब्ध करण्यात आले आहेत.

## श्री निकेतन महाविद्यालयात ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

संत ज्ञानेश्वरांच्या अमृतवाणीने आणि ज्ञानेश्वरीच्या ओव्यांनी श्री निकेतन आर्ट्स अँड कॉमर्स महाविद्यालयाचा परिसर गुरुवारी भक्तिरसात न्हाऊन निघाला. महाविद्यालयातील मराठी विभाग आणि संत ज्ञानेश्वर-तुकाराम विश्व प्रतिष्ठान, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर होत्या, तर संत ज्ञानेश्वर-तुकाराम विश्व प्रतिष्ठानचे पदाधिकारी अभिजित हेडाऊ सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा मंगलारंभ करण्यात आला.

यावेळी मराठी विभागाच्या प्राध्यापिक डॉ. वैशाली धनविजय यांनी पारायण या संकल्पनेचा अर्थ व त्याचे आध्यात्मिक महत्त्व स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर यांनी ज्ञानेश्वरी हा केवळ आध्यात्मिक ग्रंथ नसून जीवनाला योग्य दिशा देणारा विचारग्रंथ असल्याचे सांगितले. संत ज्ञानेश्वर-तुकाराम विश्व प्रतिष्ठानचे पदाधिकारी अभिजित हेडाऊ यांनी ज्ञानेश्वरीच्या नियमित वाचनातून संत ज्ञानेश्वरांचे विचार आणि जीवनमूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र मालोकार, मराठी विभागप्रमुख प्रा. मुरलीधर गवळी यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. मुरलीधर गवळी यांनी केले. तर सूत्रसंचालन मराठी विभागाच्या प्राध्यापिका कुमुद पावडे यांनी केले. या सोहळ्याची सांगता ग्रंथदिंडीने करण्यात आली. महाविद्यालयाच्या पटांगणावर आयोजित करण्यात आलेल्या या पारायण सोहळ्यास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना उद्या श्रद्धांजली, नागपूर कलाकार कट्टातर्फे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी नागपूर कलाकार कट्टातर्फे रविवार, ११ ऑक्टोबर रोजी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ४ वाजता काचीपुरा चौकातील विष्णुजी की रसोई येथील डॉ. गिरीश गांधी सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे.या कार्यक्रमात नाना पाटेकर यांच्याशी संबंधित आठवणी, त्यांच्यासोबतचे अनुभव आणि विविध प्रसंगांतील रंजक किस्से यांना उजाळा देण्यात येणार आहे.

नाना पाटेकर यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि आपल्या लाडक्या कलाकाराला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कलाकार, रसिक व चाहत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नागपूर कलाकार कट्टातर्फे करण्यात आले आहे.

## शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणाचा शेवटच्या आठवड्यात निकाल

**नवी दिल्ली :** एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये ऐतिहासिक बंड करत अखंड शिवसेनेतील ४० पेक्षा जास्त आमदार फोडले. यानंतर ठाकरे सेना आणि शिंदेंची शिवसेना यामध्ये पक्षाचे नाव आणि चिन्हावरुन जोरदार वाद सुरु आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि चिन्हाची अंतिम सुनावणी सुरु आहे. याचदरम्यान, एक महत्वाची माहिती समोर आली आहे.

शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणी सुनावणी याच महिन्यात पूर्ण होणार असल्याचं समोर आलं आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस निकाल अपेक्षित असल्याचे सांगितले जात आहे. सुप्रीम कोटार्ने आज एका सुनावणी दरम्यान ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात शिवसेना चिन्ह आणि पक्ष प्रकरण संपणार असं तोंडी सांगितले. निवडणूक आयोगाची बाजू पुढील आठवड्यात मांडली जाईल. आणि त्यानंतर उद्धव ठाकरेंचे रिजॉईंडर तिस-या आठवड्यात होईल.

आज सुप्रीम कोर्टात पश्चिम बंगाल एसआयआरची सुनावणी त्वरीत घ्यावी अशी विनंती वकीलांतर्फे करण्यात आली. त्यावेळी सुप्रीम कोटार्ने सांगितले की ३० ऑक्टोबरपर्यंत शिवसेनेची सुनावणी संपवायची आहे. त्यानंतर बंगालमधील एसआयआरचे प्रकरण घेतले जाईल. त्यामुळे ३० ऑक्टोबरपर्यंत म्हणजेच दिवाळीआधी शिवसेना पक्ष आणि चिन्ह कुणाला मिळणार, याबाबत समोर येणार आहे. शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाबाबत ८ ऑक्टोबर झालेल्या सुनावणीदरम्यान वकील नीरज किशन कौल यांनी निवडणूक आयोगाची निरीक्षणे आणि पक्षांतर्गत लोकशाहीवर भाष्य केले.

---

# दारूच्या नशेत मुलाने बापावर लोखंडी रॉडने केला हल्ला, उपचारादरम्यान मृत्यू

## बाबूळखेडा-चिचोली येथील धक्कादायक घटना, आरोपी मुलगा अटकेत

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**





बाबूळखेडा-चिचोली येथे कौटुंबिक वादातून मुलानेच वडिलांवर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (८) सकाळी घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या धर्मेंद्र धनिराम कापसे (५९) यांचा मृत्यू झाला. ते गावचे माजी सरपंच होते. घटनेनंतर पसार झालेल्या मुलाला खापरखेडा पोलिसांनी कोराडी टी-पॉइंट परिसरातून ताब्यात घेत अटक केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंकित धर्मेंद्र कापसे (३०) हा मृतकाचा एकुलता एक मुलगा असून तो पत्नी व आई-वडिलांसोबत राहत होता. अंकितला दारूचे व्यसन असल्याने तो नियमित कामधंदा करीत नसल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे घरात वारंवार वाद होत असल्याची माहिती समोर आली आहे.

गुरुवारी सकाळी सव्वानऊच्या सुमारास धर्मेंद्र कापसे हे पत्नीसह परिचित नीळकंठ राऊत यांच्या घरी गेले होते. याचवेळी अंकित दारूच्या नशेत तेथे पोहोचला. आई-वडिलांना तेथे बसल्याबाबत जाब विचारत त्याने वडिलांच्या चेहऱ्यावर मारहाण केली. त्यानंतर तो घराकडे धावत गेला आणि लोखंडी रॉड घेऊन परत आला. अंकितने रॉडने धर्मेंद्र कापसे यांच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. गंभीर दुखापत होऊन ते रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्यानंतर अंकित घटनास्थळावरून पसार झाला. घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

दरम्यान, शहर गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक ३ व ६ तसेच खापरखेडा पोलिसांच्या पथकाने आरोपीचा शोध सुरू केला. काही वेळातच कोराडी टी-पॉइंट परिसरातून अंकितला ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी खापरखेडा पोलिसांनी अंकित कापसेविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

---

## ग्रामीण कृषी कायार्नुभव कार्यक्रमांतर्गत मनोहरभाई पटेल कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची आमगाव बाजार समितीला अभ्यास भेट




**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत, मनोहरभाई पटेल कृषी महाविद्यालय, हिराटोला (जि. गोंदिया) येथील विद्यार्थिनींनी आमगाव कृषी उत्पन्न बाजार समितीला शैक्षणिक अभ्यास भेट देऊन प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पूर्ण केले. कृषी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये कृषी विपणन, बाजारपेठेतील व्यवहार आणि शेतमालाच्या दर निश्चिती प्रक्रियेचा व्यावहारिक अनुभव निर्माण व्हावा, हा या भेटीचा मुख्य उद्देश होता.

या अभ्यासदौऱ्यादरम्यान विद्यार्थिनींनी बाजार समितीच्या आवारात चालणाऱ्या शेतमालाच्या प्रत्यक्ष लिलाव प्रक्रियेचे बारकाईने निरीक्षण केले. बाजार समितीच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थिनींना धान व इतर धान्याची आवक, आवारात होणारी आवक नोंद, इलेक्ट्रॉनिक वजन काट्याद्वारे मोजमाप, तसेच पारदर्शक लिलाव पद्धतीची सविस्तर माहिती दिली.

या प्रात्यक्षिकात मुख्यत्वे 'ई-नाम' या ऑनलाइन प्रणालीच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकण्यात आला. याशिवाय, शेतमालाची प्रतवारी, साठवणुकीसाठी गोदाम आणि व्यापारी व अडत्यांची कार्यपद्धती आणि शेतकऱ्यांच्या खात्यात थेट ऑनलाईन रक्कम जमा होण्याच्या प्रक्रियेबाबत विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले.

ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत आयोजित या प्रात्यक्षिकासाठीमहाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. एस. सी. अवताडे, कार्यक्रम समन्वयक प्रा. के. आर. चव्हाण आणि कार्यक्रम अधिकारी डॉ. पी. व्ही. कोसे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या प्रात्यक्षिकात ममता रहांगडाले आर्जु रहांगडाले, रिया शहारे, सानिया सहारे, विशाखा शेंडे या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

---

# आंतरराष्ट्रीय प्राचार्य शैक्षणिक परिषद २२ ते २४ ऑक्टोबरदरम्यान

## देशभरातील प्राचार्य व शिक्षणतज्ज्ञांचा सहभाग




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

द साऊथ पब्लिक स्कूल, ओंकारनगर, नागपूर यांच्या वतीने नववी आंतरराष्ट्रीय प्राचार्य शैक्षणिक परिषद २२ ते २४ ऑक्टोबरदरम्यान इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, मिहान, नागपूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

'Understanding WOW (World of Wonderful) Generations – Bridging Insights and Innovations' हा परिषदेचा मुख्य विषय असून, बदलत्या पिढ्यांच्या शैक्षणिक गरजा, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि भविष्यातील शिक्षणव्यवस्था यांवर विचारमंथन होणार आहे.

देशातील विविध राज्यांतील नामांकित शाळांचे प्राचार्य आणि शिक्षणतज्ज्ञ परिषदेत सहभागी होणार आहेत. सनफ्लॉवर, टायची, मॅजिक पिटारा आणि सरस्वती पब्लिकेशन यांच्या सहकार्याने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

२२ ऑक्टोबर रोजी आयआयएम कोझिकोडचे संचालक प्रा. देबाशीष चॅटर्जी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. पद्मश्री पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कलाकार वासुदेव कामत विशेष अतिथी असतील. शिक्षणतज्ज्ञ डॉ. माला पलानी, भारतीय रंगभूमीवरील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व संजना कपूर आणि परिषदेच्या संयोजिका डॉ. मृणालिनी दस्तूरे यांच्यासह विविध मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी वासुदेव कामत, मेमरी ट्रेनर व गिनीज वर्ल्ड रेकॉर्डधारक अदिती सिंघल आणि आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांची व्याख्याने होतील.

परिषदेच्या निमित्ताने 'पाथेय - The Goldeb Elixir' या ई-स्मरणिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर आणि प्रसिद्ध अभिनेते व माजी खासदार डॉ. नितीश भारद्वाज यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या स्मरणिकेत भारतासह परदेशातील प्राचार्यांचे शिक्षणविषयक संशोधनपर लेख समाविष्ट करण्यात आले आहेत.

यावेळी नचिकेता आणि सुपर नचिकेता पुरस्कारांचे वितरणही करण्यात येणार आहे. शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. रझिया हुसेन आणि श्रद्धा केळापूरे यांचा सन्मान करण्यात येईल. तसेच प्रा. देबाशीष चॅटर्जी, वासुदेव कामत आणि डॉ. नितीश भारद्वाज यांनाही शिक्षण व संस्कृती क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. द साऊथ पब्लिक स्कूलचे संचालक देवेन दस्तूरे आणि सनफ्लॉवर राजेश घई यांच्या पुढाकाराने ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

या संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेला परिषदेच्या संयोजिका डॉ. मृणालिनी दस्तूरे, देवेन दस्तूरे, सल्लागार मंडळाच्या सदस्या रीना दर्गन, आयोजन समितीच्या सदस्या श्रद्धा केळापूरे तसेच सदस्य दिग्विजय दस्तूरे आणि मंगेश चिनेवार उपस्थित होते.